श्रीरामेश्वर-यात्रा.



श्री रामेश्वर.

किंमत ५ आणे.

रामेश्वर--यात्रा.

वाटेंतील क्षेत्रें व प्रेक्षणीय स्थळें यांच्या सचित्र वर्णनासह.

लेखकः—

बाळकृष्ण श्रीधर कोलटकर एल्. एजी.
रिटायर्ड डे. इन्स्पेक्टर, शाळाखातें.
पाठीवर दिलेल्या १६ पुस्तकांचा कर्ता.

—मुद्रक व प्रकाशक—

रा. रा. शंकर नरहर जोशी.
चित्रशाळा प्रेस, १०२६ सदाशिव पेठ, पुणें शहर.

किंमत ५ आणे.

अनुक्रमणिका.

रामेश्वर-यात्रा.

काशीयात्रा करून आल्याला बरींच वर्षें झालीं, तेव्हां हरिद्वाराहून आणलेलें गंगोदक रामेश्वरीं जाऊन शिवलिंगावर घालण्याचा योग लवकर येईना. शेवटीं तो सुयोग आला व रामेश्वरयात्रा यथासांग केली. तिचें वर्णन खालीं देतों.

गोविंदराज पट्टण.

पुण्याहून मेलगाडीनें निघालों तो जानेवारीं ता. ११ ला रेनिगुंठा स्टेशनावर सकाळचे ६ वाजतां उतरलों. यावेळीं हवा अगदीं कुंद झाली होती. तेथें त्रिपथीला जाण्याकरितां दुसरी गाडी येते. ती रेनिगुंठाहून ७ वाजतां सुटते. तींत बसून त्रिपथी ईस्ट स्टेशनावर उतरलों. त्रिपथी ईस्ट स्टेशन गोविंदराजपट्टण शहराला लागूनच आहे. गांवांत जाण्याला झटके मिळतात. गांवांत ४।५ धर्मशाळा आहेत. तेथें उतरण्याची सोय होते. तेथून **कपीलतीर्थधारा** म्हणून १॥ मैलावर एक तीर्थ आहे. त्यांत स्नान करण्याकरितां म्हणून गोविंदराज पट्टणाला आल्याबरोबर गेलों. येथें जाण्याला झटके मिळतात. जाण्यायेण्याची बोली करावी. कपिलतीर्थांत फार उंचावरून पाणी पडतें, त्यामुळें मौज वाटते. हें तीर्थ बरेंच मोठें आहे व त्यांत पोहण्याची मौज असते. धारेखालींही पोहत जाऊन बसावें, पण फार उंचावरून धार पडत असल्यामुळें पाण्याचा मार सहन होत नाहीं. हवा कुंद झालेली होती म्हणून फार वेळ डुंबत बसवेना. स्नान वगैरे आटोपून देवदर्शन

करून बिऱ्हाडीं परत आलों. व मग बाजारांतून सामानसुमान आणून स्वयंपाक झाला. पण श्री. **गोविंदराज** स्वामींचें दर्शन घेतल्याशिवाय अन्नग्रहण कसें करावें म्हणून पोशाख करून पगडी, जोडा घालून दर्शनास गेलों. दारांत जों जातों तों एक उघडाबोडका ब्राह्मण खसकरून आमचे अंगावर आला व तेलगु-भाषेंत बोलूं लागला. पण तो काय म्हणतो हें चांगलें कळलें नाहीं, पण तो हातानें खुणा करी त्यावरून पगडी, जोडा काढून येण्याबद्दल तो सांगत आहे असें समजलें. व देवळांत जातांना जे लोक पाहिले ते सर्व उघडे बोडकेच जात. म्हणून बिऱ्हाडीं जाऊन पगडी, जोडा, कोट वगैरे काढून, एक धोतर पांघरून पुनः आलों. १२ वाजतां दरवाजे उघडून देवदर्शन होतें असें कळलें असल्या-मुळें बाराचे आंतच देवळांत येऊन बसलों. पण कसले ते बारा. कुंभकर्णाचे प्रदेशांतले ते बारा ! एक वाजला तरी दरवाजे उघ-डले नाहींत. मग एकदांचे एक वाजल्यावर देवाचे गाभाऱ्याचे दरवाजे उघडले. मग आंत गेलों तो गोविंदराज आडवे निजलेले. अशी ही मूर्ति आडवी निजलेली कां ? महाराष्ट्रांत, उत्तरहिंदु-स्थानांत काशी वगैरेकडे देव कोठें निजलेले नाहीं आढळत. शोधांतीं असें समजलें कीं, गोविंदराज हे पायलीनें रुपये मोजतां मोजतां थकले व पायली उशाशीं घेऊन निजले. देवदर्शन करून बाहेर जों पडलों तों प्रसाद वाटण्याचें काम चाललें होतें. तो प्रसाद म्हणजे शिजलेला भात. ओवळ्यांनीं अंगांत सद्रा घालून सुद्धां हा प्रसाद हातांवर घेऊन लोक खात होते. व खाऊन झाल्यावर हात धुणें वगैरे कांहीं नाहीं. हात पुसून टाकले म्हणजे झालें. असा प्रसाद घेण्याला मन कचरलें. पण वाटणारे व इतर लोक यांनीं लेव, लेव, असें केल्यामुळें थोडासा प्रसाद घेऊन तेथेंच खाऊन हात पुसून निघालों.

त्या देवळाचा प्राकार फार विस्तीर्ण आहे. त्या देवळाच्या आवारांत दुसरींही लहान लहान देवळें आहेत. देवळाचे दरवाज्यावर गोपूर आहे सर्व देवांचें दर्शन घेऊन परत बिऱ्हाडीं आलों. जेवणखाण आटोपलें तों तीन वाजले. गोविंदराजपट्टणाहून तीन मैलांवर **त्रिरुचनुर** म्हणून खेडें आहे. तेथें श्री**महालक्ष्मी**चें देवालय आहे. तें पहाण्याकरितां एक जाण्या येण्याचा झटका ठरवून निघालों. येथें एक मोठा तलाव आहे. तो दिवस शुक्रवार असल्यामुळें देवीची पालखी निघावयाची होती. उत्सवमूर्ती गाभाऱ्याचे बाहेर आणून पूजा अर्चा वगैरे सर्व झालें. पण पाऊस पडूं लागल्यामुळें पालखी निघाली नाहीं. येथेंही देवीची पूजाअर्चा झाल्यावर प्रसाद म्हणून भात वाटला. त्यांत खडेगोटे असल्यामुळें व ब्रह्मांड तिखट असल्यामुळें आम्हीं तो सर्व न खातां मशालजीच्या पोरास दिला. तेव्हां शेजारचे लोक आमचेकडे डोळे वटारून पाहूं लागले. तेव्हां असें कां म्हणून आम्हीं विचारलें तेव्हां प्रसाद सर्व आपणच खाल्ला पाहिजे. तो कोणास देतां कामा नये, अगर टाकतां कामा नये, असें सांगितलें. परत गोविंराजपट्टणाला यावयास जरा रात्र झाली. जेवणखाण आटोपून निजलों.

व्यंकटागिरी (त्रिपथी)

ता. १२ रोजीं सकाळीं मुखमार्जन करून डोली करून त्रिपथीस जाण्याकरितां निघालों. गोविंदराजपट्टणापासून त्रिपथी ७ मैल लांब आहे. हें स्थान उंच डोंगरावर आहे. चढ फार आहे. पहिले ४ मैल तर सारखा चढावच आहे. पायऱ्या सारख्या बांधून काढल्या आहेत. इतका हा उंच चढाव नुस्ते चढून जाणें आपणांस कठीण. मग हे डोलीवाले माणसाचें ओझें घेऊन कसे चढत असतील कोण जाणें ! त्याचें अंगांतून घामाच्या सारख्या धारा चालल्या होत्या. मधून मधून ते उतरण्यास सांगत. त्यांची कींव येऊन उतरावें व

चालावें असेंच वाटे. वर गेल्यावर श्रीव्यंकटेशाची अशी प्रार्थना करावयाची ठरविली कीं जर आम्हीं पातकी असल्यामुळें इतक्यांत सद्गति द्यावयाची नसेल व पुनः जन्म द्यावयाचा असेल तर हवा तसला जन्म दे पण डोलीवाल्याचा देऊं नको. काय ते श्रम पहावेनात. वाटेनें थोडथोडा पाऊसही लागला. वर म्हैसूरकरांनीं एक धर्मशाळा बांधली आहे. पण तेथून पाणी जरा लांब असल्यामुळें, तीर्थावरच एक खोली आम्हीं भाड्यानें घेतली. या तीर्थाचें नांव **पुष्कर्णी**. यांत स्नान वगैरे आटोपून धोतरें वाळत लावून बाजारांतून सामान आणून स्वयंपाक करविला. ज्या दुकानचें सामान आणावें त्याजकडून स्वयंपाकाचीं सर्व भांडीं मिळतात. त्याबद्दल भाडें पडत नाहीं. खालून वर भांडीं आणण्याची सोय नसते. कारण चढ फार व त्याकरितां आणखी रुपया बारा आणे खर्च येतो. करितां यात्रेकरू दुकानचींच भांडीं घेतात व त्याकरितां भाडेंही पडत नाहीं. पण त्याचा वचपा सामानाच्या दरांत निघतो. तथापि इतक्या उंचीवर सर्व सामान चढवून दुकानदारांना आणावें लागतें हें लक्षांत आलें म्हणजे सामान विशेष महाग आहे असें वाटत नाहीं. आपल्या इकडे माथेरान, महाबळेश्वर वगैरे ठिकाणचे भाव पायथ्याच्या भावांशीं ताडून पाहिले म्हणजे जो फरक दिसून येतो तितका कांहीं येथें दिसून येत नाहीं.

व्यंकटेशमंदिर—नंतर आम्ही देवदर्शनाकरितां गेलों. दरवाजावर गोपूर आहे. मुख्य देवळाच्याभोंवतीं पटांगण विस्तृत आहे व सभोंवतीं ओव्या आहेत. देवळाचे शिखरावर सोन्याचा कळस आहे. हा फार लांबून सुद्धां दिसत असतो. मुख्य देवळाचे दरवाजे १२ वाजतां खुले झाले व मग आम्ही आंत दर्शनाकरितां गेलों. येथें मूर्ति श्रीव्यंकटेशाची आहे. खालील गोविंदराजस्वामी ह्यांचे हे

धाकटे बंधू होत. ही मूर्त उभी आहे. हिची उंची सात फूट आहे. पण त्यांच्या बंधूची लांबी म्हणजे गोविंदराजस्वामींची ८ फूट आहे. थोरलेच बंधू ते. दर्शनोत्सुक लोक मोठ्या भावीकपणानें त्या मूर्तींकडे सारखी टक लावून पहात असतात व जे दूरदूरचे आलेले असतात त्यांना श्रीव्यंकटेशाचें दर्शन घेऊन जन्माचें सार्थक झालें असें वाटतें. वैष्णवलोकांची ही मुख्य देवता आहे. ज्याप्रमाणें शैवांस काशी त्याप्रमाणें हें स्थान वैष्णवांची काशी आहे. वैष्णव व्यंकोबाचे गिरीला गेला नाहीं असा क्वचित् आढळतो. गिरीस कोणत्याही महिन्यांत लग्नें मुंजी वगैरे कार्यें करण्यास हरकत नाहीं असें मानतात. ज्यांना प्रथमची बायको वैशाख जेष्ठांत वारल्यामुळें चातुर्मास काढण्याचाही धीर नसतो असे घोडनवरदेव येथें येऊन चातुर्मासांत, भर पावसाळ्यांत, इतक्या उंचीवर चढून जाऊन लग्नसोहाळा उरकून घेतात.

मुख्य देवळाच्या डावे पडवींत पोष्टाच्या खांबासारखा पण वाळूच्या घड्याळाच्या आकाराचा एक खांब आहे. त्यांत रुपये मोहरा जें म्हणून देवांस अर्पण करावयाचें असेल तें टाकावें. मंडपाचे दोन्ही आंगास दोन घंटा आहेत. डावे आंगची घंटा वाजली म्हणजे गोविंद असा आवाज होतो व उजवेकडील वाजली म्हणजे नारायण असा आवाज होतो म्हणतात; पण हा चमत्कार पाहण्यास आम्हास सांपडलें नाहीं.

देवदर्शन झाल्यावर प्रसाद वाटण्याचा विधी चालतो. पण येथें असा प्रकार आहे कीं, प्रसाद विकतात. एक आण्याचा प्रसाद, दोन आण्याचा, जसा आपल्याला हवा तसा विकत घ्यावा. प्रसादाच्या भाताचेही प्रकार आहेत. खिचडी, दहीभात, असे. आम्हीं एक आण्याचा प्रसाद विकत घेतला, व बिऱ्हाडीं गेलों.

देवळांतील दीपमाळ सोन्याची आहे. देवाचें उत्पन्न

मोठें आहे. देव फार श्रीमंत आहे. नाहींतर आमचे काशीचे विश्वेश्वर. नांव मोठें पण पायीं कथिलाचा वाळा. बिऱ्हाडीं आल्यावर भोजन केलें तों पावसास जी सुरवात झाली ती संध्याकाळपर्यंतच नव्हे तर रात्रभर सारखा पाऊस पडत होता. क्षणभरसुद्धां पाऊस थांबला नाहीं कीं बाहेर पडूं दिलें नाहीं. पण पहांटेपहांटे पाऊस थांबला.

ता. १३. गिरीवर व्यंकोबाचे देवळाचे पलीकडे ३ मैलांवर **पापनाशिनी** म्हणून तीर्थ आहे, तेथें स्नानास जावें असें ठरलें. लांबीचा पल्ला म्हणून डोली पाहूं लागलों तो आदले दिवशीं पाऊस झाल्यामुळें डोलीवाले २॥–३ रुपये मागूं लागले. खालून सात मैल लांब चढून येण्याला २–२॥ रुपये पडले, व येथें बहुतेक सपाटीवर जाण्याला २॥–३ रुपये मागूं लागलें म्हणून आम्हीं पायीं जाण्याचा निश्चय केला, व त्याप्रमाणें निघालों. तेथें पोंचल्यावर घोंघों आवाज करीत येणारा पापनाशिनीच्या पाण्याचा समूह पाहून आनंद वाटला. पापनाशिनी हा नदीचा धबधबा आहे. त्याची उंची फार नाहीं. १५।२० फूट उंची असेल पण प्रवाह जोराचा असल्यामुळें त्याचे खालीं उभें राहून स्नान करणें कठिण वाटतें. पण पाणी जें पडतें तेंच तीर्थ असल्यामुळें खालीं उभें राहून स्नान केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. म्हणून आम्ही तसें स्नान केलें. तेथें एक भटजीबुवा मंत्र सांगण्यास आलेच होते. त्यांस दक्षणा देऊन वर आलों. त्या तीर्थावर कित्येक बैरागी झोंपड्या बांधून राहिले आहेत. त्यांस पै पैसा देतदेत आम्हीं परतलों. त्या तीर्थांत स्नान केल्यानें मोठें पुण्य लागतें, असें सांगतात. ४२ कुळें मागचीं व पुढेंही होणारीं ४२ कुळें त्या एका स्नानानें उद्धारलीं जातात म्हणून आम्हांस भटजीबुवानीं सांगितलें. असो. निम्या वाटेवर आल्यावर उजवे अंगास एक वाट

फुटते. त्या वाटेनें जरा गेलें म्हणजे दुसरें एक **आकाशगंगा** नांवाचें तीर्थ लागतें. तेथें आम्हीं गेलों. तेथेंही धबधबा आहे. प्रवाह फार जोराचा नाहीं पण उंची जरा जास्त आहे. त्यांत आम्हीं मार्जन करून निघालों तो गिरीगांवाजवळ येतांना डावे अंगास एक वाट फुटते. तिनें मैलभर गेल्यावर **गोगर्भ** म्हणून एक तीर्थ आहे. तेथें आम्हीं गेलों. येथें धबधबा नाहीं. एक नदी वहाते आहे. तिच्या पाण्यानें मार्जन करून परत बिऱ्हाडी आलों तों ११ वाजले. मग लवकर स्वयंपाक करून १२ वाजतां पुन्हां देवदर्शन करून आलों व भोजन केलें. व मग गांवांत जरा इकडे तिकडे हिंडून डोली करून खालीं गोविंदराजपट्टणास आलों. येथें आणखी एक **रामाचें** देऊळ प्रसिद्ध आहे तें पाहिलें. हें रामाचें देऊळ, गोविंदराज स्वामीचें देऊळ व गिरीचे व्यंकोबा या सर्वांचा खर्च एकाच संस्थानांतून होतो. त्या संस्थानचे कारभारी गोविंदराजपट्टणाला रहातात.

बिऱ्हाडीं येऊन स्वयंपाक करून जेवण झाल्यावर झोपीं गेलों. ता. १४. त्या दिवशीं संक्रांत असल्यामुळें **कपील धारातीर्थावर** स्नानास झुंडीच्या झुंडी जात होत्या. आम्हींही स्नान करून आलों व आगगाडीनें मद्रासेस जावयाचें होतें म्हणून लवकर स्वयंपाक करून त्रिपथी स्टेशनावर आलों. गाडींत बसून रेनिगुंठाला गेलों. तशीच ती गाडी पुढें कालास्तीला जाते.

कालास्ती.

दक्षिणेंत जीं ५ प्रसिद्ध लिंगें आहेत त्यांपैकीं कालास्ती हें एक आहे. त्या पांच लिंगांचीं नांवें पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश अशीं आहेत. त्यांपैकीं वायु हें नांव कालास्तीला आहे. हें देवालय कालास्ती स्टेशनापासून १ मैलावर एका लहानशा टेकडीवर आहे. वायुलिंग नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं, त्या देवळाचे

गाभाऱ्यांत लिंगावर एक दिवा आहे व गाभाऱ्यांत वाऱ्याचा टिपूस सुद्धां शिरत नसतां हा दिवा एकसारखा त्या लिंगाचे सामर्थ्यानें फिरत असतो. म्हणून त्याला वायुलिंग हें नांव पडलें आहे.

बाकीच्या ४ लिंगांपैकीं पृथ्वीलिंग त्रिव्हालूर येथें आहे. आपलिंग त्रिवानकन येथें आहे. तेजलिंग त्रिनमनवल्ली येथें आणि आकाशलिंग चिदंबरम येथें आहे.

त्या वेळीं कालास्तीला कॉलरा असल्यामुळें आम्हीं तेथें गेलों नाहीं. रेनिगुंठाला ह्या गाडींतून उतरून रायचूरकडून मद्रासेस जाणारी दुसरी गाडी येते तींत बसून मद्रासेस संध्याकाळीं ६ वाजतां पोंचलों. स्टेशनाजवळच एक मोठी धर्मशाळा आहे. येथें उतरण्याची चांगली सोय आहे. आणखीही लाहानमोठ्या धर्मशाळा व भोजनालयें आहेत.

मद्रास.

ता. १५ ते २० सहा दिवस मद्रासेस आम्हीं मुक्काम केला. येथें आल्यावर दोन तीन दिवस फार पाऊस पडल्यामुळें येथें जास्त मुक्काम झाला. मद्रासेस मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटासारखें मार्केट आहे, पण त्यांत कांहीं विशेष असें आम्हांस वाटलें नाहीं.


पार्क—येथें एक फार जुनें म्हणजे १८५९ सालीं स्थापिलेलें पार्क आहे तें पाहिलें. तें फार मोठें आहे. त्याचें क्षेत्र ११६ एकर आहे. त्यांत ११ तळीं आहेत. पुष्कळ लहान मोठे रस्ते आहेत. त्यांची लांबी ५।६ मैल आहे. त्यांत एका भागांत प्राणी ठेविले आहेत. सिंह, वाघ, निरनिराळ्या प्रकारचे पक्षी, माकड, सुसरी असे अनेक प्राणी आहेत. पार्कच्या दक्षिणेकडील भागांत व्हिक्टोरिया हॉल आहे. त्याच्या तळमजल्यावर ६०० व वरील

मजल्यावर ६०० व गॅलरींत २०० माणसें मावतील एवढा हा मोठा आहे.

येथें एक **पदार्थसंग्रहालय** आहे तें पाहण्यास आम्हीं गेलों. प्रथमदर्शनीं दारांतच निरनिराळ्या जातींचे जिवंत सर्प ठेविले आहेत. त्याचेपलीकडे निरनिराळ्या प्राण्यांचे सांगाडे ठेविले आहेत. त्यांत एक व्हेलमाशाचा सांगाडा केवढा मोठा व किती तरी लांबच लांब आहे. त्याचे पलीकडे एक मोठें दालन आहे. त्यांत सर्व प्रकारच्या अशुद्ध धातु असून त्या शुद्धस्थितींत येतांना कोणकोणत्या अवस्थेंतून येतात त्यांचे नमुने ठेविले आहेत. एका अंगाला पुराणवस्तूंचा संग्रह आहे. माडीवर लाकडांचे नमुने व इतर उद्भिज पदार्थांचे नमुने आहेत. एका अंगाला माशांचे नमुने आहेत. एके ठिकाणीं पुष्कळ प्रकारचीं जुनीं नाणीं ठेविलीं आहेत. पण तीं पहायाला परवानगी लागते, ती घेतलेली नव्हती म्हणून आम्हांस तीं पाहण्यास मिळालीं नाहींत. हीं म्युझियम व पार्क म्हणजे मुंबईचा राणीचा बागच होय. ह्या म्युझियमला जोडून एक **लायब्ररी** आहे. ही इमारत फार उंच, भव्य व शोभिवंत आहे. हींत पुस्तकांचा संग्रह विपुल आहे. व तो नीट स्थितींत राखण्याकरितां नोकरचाकरही पुष्कळ आहेत.

मद्रासचे पूर्व अंगाला समुद्रावर एक **अकवेरिअम** आहे. त्यांत निरनिराळ्या प्रकारचे जिवंत मासे ठेविले आहेत. त्यांचे लहानमोठे रुंदनिरुंद वगैरे आकार पाहून मौज वाटते. हें सर्व पाण्यांत ठेविले आहेत हें सांगणें नकोच. यांना ताजें पाणी मिळावें म्हणून यांत पाण्याच्या नळ्या आणून सोडिल्या आहेत. व यांना ताजी हवा मिळावी म्हणून एका खोलींत हवा घालण्याचें यंत्र चालू असतें, त्यामुळें ज्या पाण्यांत हे मासे ठेविले

आहेत त्यांत हवा येऊन मिसळते. हें पाहण्याला माणशीं एक आणा कर आहे.



मद्रासचें हायकोर्ट.

एक दिवस आम्ही आणखी कांहीं इमारती पाहण्यास

गेलों. त्यांत **हायकोर्टची** इमारत भव्य आहे व आंत नक्षीचें काम आहे. त्याच इमारतींत कुलाब्याची जशी दांडी तसा **दीपगृह** आहे. तें पाहण्याकरितां वर चढून गेलों. वर गेलें म्हणजे सभोंवार देखावा दिसतो व सर्व मद्रास शहर दिसतें. त्या दीपाचें तेज १८००० मेणबत्त्यांच्या तेजा इतकें आहे. व कुलाब्याच्या दांडीप्रमाणें दर अर्ध्या मिनिटानें प्रकाश चक्क होतो. दुसऱ्या अनेक इमारती आहेत पण त्यांत विशेष पाहण्यासारखें नसल्या-मुळें आम्ही आंत गेलों नाहीं.


मद्रासेहून ५ मैलांवर **अडेर** येथें थिऑफिसचें आद्यपीठ आहे. येथील जागा फार विस्तीर्ण म्हणजे ३५० एकर आहे. एका अंगास नदी व दुसरें अंगास समुद्र यामुळें या जागेला फार रम-णीयता आली आहे. नारळांचें दाट बन आहे. एक फार मोठें वडाचें झाड आहे. त्याला पारंब्या फुटून त्याचीं अनेक झाडें होऊन झाडाचा मोठा विस्तार झाल्यामुळें फार शोभा आली आहे. येथील आवारांत अनेक बंगलें, ऑफिसें व लायब्ररी आहे. लायब्ररींत अनेक पुस्तकें असून ताडपत्रावर लिहिलेले ग्रंथही पुष्कळ आहेत.

कांजीवरम (शिवकांची–विष्णुकांची)

मद्रासेस एक आठवडा राहून ता. २१ रोजीं येथून निघालों तों चिंगलपटवरून कांजीवरमला संध्याकाळीं ६ वाजतां येऊन पोंचलों. तो सोमवार होता म्हणून उतरल्याबरोबर **शिवकांचीचे** देवालयांत शिवाचें दर्शन घेऊन बिऱ्हाडीं आलों. स्वयंपाक वगैरे करून जेवण आटोपून झोपीं गेलों.

ता. २२ रोजीं उठल्याबरोबर मुखमार्जन करून येथें एक **सर्वतीर्थ** आहे त्यांत स्नान करून आलों व अगोदर **विष्णुकां-चीला** गेलों. विष्णुकांची शिवकांचीपासून ३ मैलांवर असल्या-मुळें एक झटका जाण्यायेण्याचा ठरवून गेलों. त्या दोन्हीं गांवांत

जरी इतकें अंतर आहे तरी एका गांवापासून दुसऱ्या गांवापर्यंत



विष्णुकांची देवळांतील १०० खांबी मंडप.

सारखीं घरें आहेत. म्हणजे दोन्हीं गांवें मिळून एकच गांव झालें

आहे. हें तालुक्याचें ठिकाण आहे पण त्याचें जें जिल्ह्याचें ठिकाण चिंगलपट त्यापेक्षां किती तरी हें मोठें आहे. विष्णुकांची देवळाचा गोपूर लहान आहे. ह्या देवळांत आंत शिरल्यावर डावे अंगास एक १०० खांबी मंडप लागतो. त्या खांबावरील नक्षीकाम फार प्रेक्षणीय आहे. त्या मंडपाचे पूर्वेस एक **कोटीतीर्थ** आहे. मुख्य देवळाची इमारत तीनमजली आहे. त्यांतील मुख्य देवतेचें म्हणजे विष्णूचें मंदीर तिसऱ्या मजल्यावर आहे. तें **विष्णुवरदाज** नामानें प्रसिद्ध आहे, दुसऱ्या मजल्यावर **लक्ष्मीचें** देवालय आहे. ही देवी रत्नजडित भूषणांनीं मंडित आहे. त्या मजल्यावरच वरच्या तक्तपोशीला एक **सोन्याची पाल** बसविलेली आहे. तिचें दर्शन झालें म्हणजे पाल अंगावर पडल्याचा दोष नाहीं इतकेंच नव्हे तर त्या पालीचें दर्शन घेऊन आलेल्या माणसाचें पायावर डोकें ठेविलें म्हणजे त्यालाही पाल पडल्याचा दोष लागत नाहीं म्हणून सांगतात.

त्या विष्णुकांचीला दक्षिणकाशी असें म्हणतात. त्याबद्दल आख्यायिका अशी आहे कीं, ब्रह्मदेवांनीं एकदां लक्ष्मीची फार स्तुति केली, ती ब्रह्मदेवाची बायको सरस्वती ईस न आवडून त्या दोघींचें भांडण झालें व सावित्री रुसून निघून गेली. पुढें ब्रह्मदेवांनीं कांचीला अश्वमेध यज्ञ चालविला. कांचीस एक यज्ञ केल्यानें १००० यज्ञ केल्याचें फळ येतें म्हणून ब्रह्मदेवांनीं ही जागा पसंत केली. सावित्रीनें नदीचें रूप धारण करून हा यज्ञ व ती जागा सर्व वाहून टाकण्याचा बेत केला. तेव्हां ब्रह्मदेव घाबरून त्यांनीं संकटनिवारणार्थ विष्णूची प्रार्थना केली. तेव्हां विष्णूंनी विराटरूप धारण करून नदीच्या पुरापुढें आडवें होऊन पूर वाढण्याचें त्यांनीं बंद केलें. तेव्हां सावित्री लज्जित होऊन तिनें नदीचें रूप टाकून देऊन विष्णूची प्रार्थना केली कीं, कांची

हें स्थान काशीहून पवित्र समजावें व आपण हें वसतिस्थान करावें. विष्णु तथास्तु म्हणून अंतर्धान पावले. त्याच ठिकाणीं देऊळ बांधून विष्णूची स्थापना केली.

विष्णुकांची येथें माघ व वैशाखमासीं उत्सव होतो व फार, मोठी यात्रा जमते. तेव्हां रोज निरनिराळ्या वहानांवर उत्सवमूर्त बसवून पालखी काढतात. वहानें ज्या जागीं ठेविलीं आहेत तेथें तीं पाहण्यास गेलों. मोर, सिंह, हत्ती, घोडा, मारुती, गरुड, शेष, गाय, हंस व वाघ अशीं १० वाहनें आहेत.


नंतर आम्हीं परत शिवकांचीला येतांना वाटेंत **मीनाक्षीचें** देऊळ लागतें तें पहाण्यास गेलों. ही मीनाक्षी आसन घालून बसलेली आहे. मूर्त मोठी आहे. त्या देवळाचे आवारांत एक **शंकराचार्यांची** मूर्त आहे. मीनाक्षीचें देवळाजवळ देवांनीं विराटरूप धारण करून बळीस पाताळीं घातलें त्या **वामनाचें** देऊळ आहे.

बिऱ्हाडीं येऊन जेवणखाण आटोपून शिवमंदिरांत गेलों. कारण आदले दिवशीं शिवाचें दर्शन झालें होतें, पण रात्र झाल्यामुळें सर्व देऊळ पाहण्यास सांपडलें नव्हतें. देवळाचा पुढील भाग जीर्ण झालेला आहे व त्याच्या जीर्णोद्धाराचें काम चालू आहे. देवळांचा आकार फार मोठा आहे. व भोंवतीं १०८ लिंगें आहेत. देवळाचे मागले अंगास जुनाट अंब्याचा वृक्ष आहे. त्याचे फांटे वेदरूपी आहेत असें सांगतात. देवांचें दर्शन घेऊन गोपुरावर चढलों. **गोपूर** फार उंच आहे. कुंभकोणम् येथील गोपुराशिवाय इतका मोठा गोपूर कोठें नाहीं. त्याला ९ मजले आहेत. अगदीं वरती जाऊन सर्व गांवाची शोभा पाहून खालीं आलों व आगगाडीची वेळ झाल्यामुळें स्टेशनावर येऊन आगगाडींत बसून चिंगलपटला गेलों. तेथें फराळ करून निजलों.

चिंगलपट—पक्षीतीर्थ.


ता. २३ ला उठल्याबरोबर पक्षीतीर्थाला जाण्याचा बेत केला. पक्षीतीर्थ चिंगलपटहून १० मैल आहे. एक झटका करून निघालों. येथें एक शंखतीर्थ आहे. त्यांत स्नान करून मग पक्षीतीर्थाची टेकडी चढावयास लागलों. टेकडीची चढण अर्धा मैल असून पायऱ्या आहेत. वर एक शंकराचें देऊळ आहे. या देवळांत इतका अंधेर आहे कीं, डोळ्यांत बोट घातलें तरी दिसत नाहीं. गाभाऱ्यांतील दिव्याच्या उजेडानें शंकराचें दर्शन घेऊन बाहेर आलों व मग पक्षीतीर्थावर गेलों. हें तीर्थ म्हणजे एक खडकांत खांच आहे तींत सांठलेलें पाणी होय. या तीर्थाचे पाण्यानें मार्जन करून बाजूला जाऊन बसलों. मग एक पुजारी बारा वाजल्यावर भाताचें एक भांडें घेऊन आले. व दोन पाट मांडून एका पाटावर नैवेद्य ठेवून आपण दुसऱ्या पाटावर पक्ष्यांची वाट पहात बसले. इतक्यांत एक पक्षी भराऱ्या मारीत त्या टेकडीवर आला. तो आल्याबरोबर भटजी त्याला साष्टांग नमस्कार घालून पाटावर येऊन बसले. व मग पक्षीहि जवळ आला. व त्याला भटजींनीं नैवेद्य थोडा थोडा चारला व त्याचेपुढें वाटी ठेविली. त्यांत पाणी असावें. तें तो पिऊन उडून आकाशांत गेला. बराच वेळ झाला तरी दुसरा पक्षी येईना. तेव्हां भटजीबुवांनीं आपल्या चेल्यास कांहीं सांगितलें. बहुतकरून तो पक्षी पिंजऱ्यांतून सुटून बाहेर गेला कीं नाहीं तें पाहून ये असें सांगितलें असावें असा तर्क आहे. चेला गेल्यावर बऱ्याच वेळानें दुसरा पक्षी आला. हा पक्षी पहिल्या पक्ष्यापेक्षां जरा मोठा होता व त्याच्या पिसाऱ्यांत एक दोन पंख काळे होते. हाही नैवेद्य खाऊन पाणी पिऊन उडून गेला. हा पुष्कळ वेळ भराऱ्या मारीत होता.

पक्ष्यासंबंधानें अशी आख्यायिका आहे कीं हे पूर्वजन्मीं ऋषि



पक्षी—तीर्थ.

होते. व ते शापामुळें पक्षी झाले. ते प्रत्येक अवतारांत निरनिराळ्या पक्ष्याचे रूपानें अवतरतात. रामअवतारीं हे जटायु होते. हे पक्षी अंतरिक्षांत कोठें तरी भ्रमण करीत असतात व




चिंगलपट एथील किल्ला.

१२ वाजले कीं नैवेद्य खावयास येतात अशी भाविकांची कल्पना आहे. पण हे पाळलेले असावेत. असो. पक्ष्यांनीं उच्छिष्ट केलेला नैवेद्य प्रसाद म्हणून विकतात.

नंतर आम्ही पक्षीतीर्थावरून खालीं गांवांत आलों. तेथें पार्व-

तीचें एक देवालय आहे तें पाहिलें व आणखी कांहीं किरकोळ



त्रिकाळी कुंड.

देवालयें आहेत त्यांचें दर्शन घेऊन शंखतीर्थावर येऊन बसलों.


त्या दिवशीं एकादशी असल्यामुळें बरींचशी केळीं खरेदी करून आणलीं व तीं खाल्लीं. त्या प्रदेशांत केळीं बरीं असतात व तीं पैशास तीनप्रमाणें मिळतात. नंतर परत चिंगलपटला २।३ वाजतां आलों. मग जरा विश्रांति घेऊन गांव पहाण्यास निघालों. येथें एक जुना मोठा किल्ला आहे. व एक त्रिकाली कुश्मचें प्रसिद्ध देवालय आहे बाकी गांवांत पहाण्यासारखें कांहीं नाहीं. तेच दिवशीं रात्रौ चिंगलपटहून निघालों.

चिदंबरम्

ता. २४ रोजीं ११ वाजतां चिदंबरमला येऊन पोंचलों. देवाचे दरवाजे सर्व बंद असल्याचे कळल्यावरून व द्वादशी होती म्हणून अगोदर बाजारांतून जरूर तें सामान आणून स्नान करून स्वयंपाक झाल्यावर भोजन करून चिदंबरमचें देवालय पहाण्यास गेलों. हें देऊळ अगदीं गांवांतच मध्यभागीं आहे. चारी बाजूला दरवाजे आहेत व प्रत्येक दरवाजावर गोपूर आहे. देवळाचा विस्तार मोठा आहे. त्या देवळांत ४ प्राकार आहेत. अगदीं आंतल्या प्राकारांत विष्णूचें व शिवाचें अशीं दोन देवळें जवळ जवळ आहेत.

अगदीं बाहेरचे प्राकारांत कोठें फुलझाडांचे बगीचे आहेत व कोठें रान माजलेलें आहे. दुसऱ्या प्राकारांत १००० खांबी मंडप आहे. एक सुवर्णनामें तीर्थ आहे; व एक मोठा नंदी आहे. एवढा मोठा नंदी आपल्याकडे कोठेंच बघावयास मिळावयाचा नाहीं. ह्याची लांबी १०।१२ फूट आहे. व उंची ८।९ फूट आहे. उत्तर दरवाजाचे आंत सुब्रह्मण्याचें देऊळ आहे. त्याचें पटांगण मोठें आहे. तिसऱ्या प्राकारांत लक्ष्मी व पार्वती ह्यांचीं देवळें आहेत. व ४ थ्या म्हणजे आंतील प्राकारांत नटराजाचें व विष्णूचें अशीं देवळें आहेत असें वर सांगितलेंच आहे. शंकराचें

देवळावरील शिखरावर सोन्याचा पत्रा घातलेला आहे व देवळाचे



चिदंबरमचें देऊळ.

खांब व पायऱ्या रुपयांनीं मढविलेल्या आहेत. शंकराचें रूप नटराजाचें असल्यामुळें त्याला चार हात आहेत. शेजारीं विष्णूचें देऊळ आहे; पण त्यांत विशेष कांहीं नाहीं. शिवमंदिरांत एक शंकराची स्फटिकाची पिंडी आहे. ती ६ बोटें उंच असून तिच्या शाळुंकेची लांबी ७।८ बोटें आहे. एवढा मोठा स्फटिक कचितच बघावयास मिळतो. याची किंमत किती तरी रुपये असेल.

याच देवळांत शिवाचें एक शयनमंदीर आहे. तें अगदीं काळ्या गुळगुळीत फत्तराचें आहे. त्याला लागूनच एक **आकाशलिंग** आहे. म्हणजे एका भिंतीपुढें एक पडदा सोडलेला आहे. तो बाजूला करून हें आकाशलिंग असें सांगतात. आंत कांहीं नाहीं, आकाश म्हणजे पोकळी तेव्हां आंत कांहीं नाहीं हें बरोबरच आहे. चिदंबरमहून रात्रीं बारा वाजतां आम्हीं निघालों.

कुंभकोण.


तों दुसरे दिवशीं म्हणजे ता. २५ रोजीं सकाळीं ८ वाजतां कुंभकोणमला आलों. येथें **कावेरी** नदी आहे. हिला दक्षिणगंगा म्हणतात. उतरल्याबरोबर प्रथम नदीवर स्नानास गेलों. येथें नदीला घाट बांधलेला आहे; पण नदीचें पात्र दुसऱ्या तीराला गेलें असल्यामुळें घाटाचा कांहीं उपयोग नाहीं. स्नान वगैरे करून देवदर्शनास निघालों. येथें एकंदर १६ देवळें, १२ शिवाचीं व ४ विष्णूचीं, अशीं आहेत. त्यांत ४ मुख्य आहेत. तीं आम्हीं पाहिलीं. चक्रपाणिमंदिर हें विष्णूचें आहे. तें कावेरीनदीचें कांठीं एका लहानशा टेकडीवर बांधलेलें आहे.

येथून थोडें अंतरावर शिवाचें **कुंभेश्वरस्वामी** नांवाचें देवालय आहे. या देवळांत जाण्याचा जो प्राकार आहे त्याची लांबी फार म्हणजे ३०० फुटावर आहे. रुंदी १५।१६ फूट आहे. या

प्राकाराचे दुतर्फा दुकानें आहेत. येथें सर्वप्रकारचे जिन्नस मिळतात. प्राकाराचे शेवटाचे डावे अंगास एका दालनांत वहानें ठेवलीं आहेत. तीं सर्व चांदीचीं असून चांगल्या स्थितींत आहेत. मुख्य मंदीर **शिवाचें** आहे व दुसरें एक **पार्वतीचें** मंदिर आहे. दिवस शुक्रवार असल्यामुळें पार्वतीचे पूजेस जाणाऱ्या बायकांची गर्दी होती. बिचाऱ्या शंकराला कोणी पुशीत नव्हतें. कुंभेश्वरस्वामीचे ५ रथ मंदिराचबाहेर रस्यावर होते. पुढें आम्हीं **राममंदिरास** गेलों. येथें खांबावरील नक्षीकाम पहाण्यासारखें आहे. त्या मंदिराच्या भिंतीवर रामचंद्राच्या १४ वर्षें वनवासांतील घडलेल्या सर्व गोष्टींचीं अनुक्रमानें चित्रें काढलीं आहेत. हा त्या मंदिराचा विशेष आहे. हें लक्ष लावून पहाण्याला बराच वेळ लागतो.

मग आम्हीं **शारंगपाणीचें** देवालय पहाण्यास गेलों. त्या देवळाचा गोपूर फार उंच आहे. त्याची उंची १५० फूट असून त्याला १३ मजले आहेत. त्यावरील चित्रेंही फार सुबक आहेत. एवढा मोठा गोपूर हिंदूस्तानांत कोठेंही नाहीं. त्या गोपुराकडे सारखे पहात रहावें असें वाटतें. देवळाचे मागचे अंगास पांच लहान गोपुरें आहेत. येथें पोटमराईचें तीर्थ आहे. मागूनही देखावा मनोहर आहे.

नंतर आम्हीं **महामहतीर्थावर** गेलों. हें महामहतीर्थ फार प्रसिद्ध आहे. वाटेंत एक शिवाचें जुनें देऊळ लागतें. या तीर्थांत १२ वर्षांनीं म्हणजे सिंहस्तांत गंगा येते. तेव्हां लक्षावधी लोक या तीर्थांत स्नान करण्यास येतात. हें तीर्थ मोठें आहे. त्याचा विस्तार २० एकर आहे, पण सिंहस्तांत जेव्हां यात्रा स्नानास उतरते तेव्हां या तीर्थांत जिकडेतिकडे माणसांचीं डोकींच डोकीं दिसत असतात. एवढी यात्रा येते. कुंभकोणमला दरवर्षी माघांत उत्सव असतो. महामहतीर्थावर लहान लहान पुष्कळ देवळें आहेत.



कुंभकोण येथील महामही तीर्थावरील यात्रेचा देखावा.

त्यांत **व्यासाचें** देऊळ प्रसिद्ध आहे. त्या देवळाचे प्राकारांत उजवे अंगास **सप्तकन्यांचें** एक लहानसें देऊळ आहे. त्या देवळाची अशी आख्यायिका आहे कीं, त्या सप्तकन्या मुलें होईनात म्हणून व्यासाकडे गेल्या व त्यांची त्यानीं आराधना केली, तेव्हां ते प्रसन्न होऊन त्यांनीं त्यास पुत्र होतील म्हणून आशीर्वाद दिला व तुमची जे पूजा करतील त्यांसही अपत्यें होत नसतील तर होतील म्हणून सांगितलें. म्हणून लोकांनीं यांचें हें मंदिर बांधलें आहे. यांचे दर्शनास निपुत्रिक बायकामाणसें फार येतात. नंतर आम्हीं बिऱ्हाडीं येऊन स्वयंपाक करून भोजन आटोपून संध्याकाळीं तंजावरला जाण्याकरितां निघालों. तंजावरास पोंचण्यास रात्र झाल्यामुळें व दुपारीं जेवण उशीरा झालेलें होतें म्हणून फराळ करून झोपीं गेलों.

पुण्याहून निघाल्यापासून तंजावरास येईपर्यंत भाषेच्या दृष्टीनें आमचे फार हाल झाले. झटकावाला, हमाल, वाणी, उदमी वगैरे कोणासही आम्हीं काय म्हणतों तें त्यांस समजूं नये व ते काय म्हणतात तें आम्हांस समजूं नये. झटकेवाल्याला अमकीकडे ने म्हटले म्हणजे तें त्यास न समजून त्यानें भलतीकडे न्यावें. धर्मशाळेंत ने म्हटले म्हणजे त्यानें एकाद्या खानावळींत न्यावें नाहींतर अन्नछत्रांत न्यावें. व मग आम्हांस कोणी इंग्लिश जाणणारा गांठून त्याचेकडून झटकेवाल्यास आम्हांस कोठें जावयाचें तें बरोबर कळवावें. बाजारांत गेल्यावर एकाद्या किरकोळ पदार्थाची किंमत काय म्हटलें म्हणजे व्यापाऱ्यानें दोन बोटें करावीं. आम्हीं तो दोन पैसे म्हणतो आहे असें समजून दोन पैसे द्यावयास लागलों म्हणजे त्यानें रागवावें व मग आम्हीं चवली द्यावयास लागलों म्हणजे त्यानें मान डोलवून ती त्यानें घ्यावी. अशा रीतीनें आम्हांस बराच त्रास होई. इकडील लोकांना मराठी येत नाहीं. त्यांत विशेष नाहीं पण हिंदुस्थानीसुद्धां बिलकूल समजत नाहीं.

थोडे शिकलेले शिवाय बाकी कोणास इंग्रजी तुटके शब्दसुद्धां कळत नाहींत. उत्तरहिंदुस्थानांतही इंग्रजीचा प्रसार इकडच्यापेक्षां कमीच म्हटलें तरी चालेल; पण तिकडील भाषा हिंदुस्थानी असल्यामुळें आपल्या मोडक्यातोडक्या हिंदुस्थानींत त्यांस आपला मतलब कळवितां येत असे. पण इकडे जिकडे तिकडे तामीळ, दुसऱ्या भाषेचा गंध नाहीं. इकडील लोकांना खुणाशास्त्रही अवगत नाहीं म्हटलें तरी चालेल. तेच आम्हीं तंजावरला आल्यावर आम्हांस कांहींसा धीर आला.

तंजावर

श्रीशिवाजीमहाराजांचे बंधु व्यंकोजी यांनीं जेव्हां तंजावरास राज्य स्थापिलें तेव्हां त्यांचेबरोबर महाराष्ट्रांतून बरेच महाराष्ट्रीय आले व ते तेथें स्थायिक झाले. त्यांनीं मराठी भाषा राखिली आहे. आतां तिच्यांत तामिळ भाषेंतील पुष्कळ शब्दांची भेसळ झाली आहे. तथापि येथील लोकांची बोली मराठी असल्यामुळें आपणांस समजण्यास अडचण पडत नाहीं. तंजावराहून, त्रिचनापल्ली, मदुरा वगैरेकडे हे लोक थोडेथोडे पसरले आहेत. त्यामुळें त्या दोनचार ठिकाणीं आम्हांस त्रास झाला नाहीं. रामेश्वरास तर बहुतेक उपाध्ये लोक कोकणस्थच आहेत. असो.

ता. २६ रोजीं सकाळीं उठल्यावर मुखमार्जन करून प्रथम आम्हीं भद्रेश्वराचें देऊळ बघण्यास गेलों. देवळाचे पुढील दरवाज्यावरील गोपुर उंच आहे. त्याची उंची ९० फूट आहे. व आंतील दरवाज्यावरील गोपुराची उंची ६० फूट आहे. दोन्ही दरवाजांतून आंत गेले म्हणजे उजवे अंगास पार्वतीचें मंदिर आहे. ही मूर्ति बरीच उंच म्हणजे १० फूट आहे. देऊळ रथावर बसविल्याचा भास केला आहे. देवळाचे दोन्ही अंगास बाहेरून


अशीं मोठी चाकें बसविलीं आहेत, व पुढचे बाजूस घोडे काढून त्यावर स्वार बसविले आहेत. आंतले अंगास हत्ती, घोडे वगैरे



तंजावर येथील भद्रेश्वराचें मंदिर.

चालले आहेत असें दाखविलें आहे. चाकें, हत्ती, घोडे वगैरे सर्व एकेका दगडाचे केलेले आहेत. हें मंदिर पाहून मुख्य शंकराचे देवळाकडे निघालों तो वाटेंत मुख्य देवळासमोर एक नंदीचे

देऊळ लागलें. त्यांतील नंदी प्रचंड आहे. त्याची लांबी, रुंदी व उंची अनुक्रमें १६, ७, १२, आहे व त्याचें वजन ३५ खंडी आहे. हा नंदी काळ्या कुळकुळीत एका दगडाचा केलेला आहे.



मंढेश्वरापुढील नंदी.

हा बसलेला आहे. उभा राहिला तर वरील इमारत पाडून टाकील. याचेबद्दल अशी एक आख्यायिका आहे कीं, हा नंदी हळूहळू वाढूं लागला तेव्हां पुजाऱ्यास धास्ती पडली कीं, हा देऊळ पाडून

टाकील. म्हणून त्यानें शंकराची आराधना केली. तेव्हां शंकरानीं त्याचें डोक्यावर नखें रोवलीं तेव्हां त्याची वाढ खुंटली.

मुख्य देवळाचे मागचे व डावे अंगास लांबचलांब ओव्या आहेत. त्या पहाण्यांत एक प्रकारची मौज वाटते. त्या ओव्यांत अनंत शिवलिंगें आहेत, व इतरही कांहीं देवांच्या मूर्ति आहेत. शंकराचे देवळाचे डावे बाजूला **सुब्रह्मण्य** यांचें देऊळ आहे. त्या दोन देवळाचे दरम्यान **चंडिकेश्वराचें** लहानसें देऊळ आहे. चंडिकेश्वराचें काम कोणी आल्यागेल्यास भद्रेश्वराला वर्दी पोंचवावयाची हें होय.

सुब्रह्मण्याचे देवळाचें नक्षीकाम चांगलें आहे. देवाचें व चंडिकेश्वराचें दर्शन घेऊन मग आम्हीं **भद्रेश्वराचें** देवळांत गेलों. आंतील पिंडी पाहून चकित झालों. ही पिंडी फार उंच व मोठी आहे. तिच्याभोंवती सज्जा काढलेला आहे व सज्जावर जाण्यास शिडी आहे. सज्जावर चढून गेल्याखेरीज पिंडीवर अभिषेक करतां येत नाहीं. त्याची शाळुंका केवढी तरी अजस्र आहे. तिचा बाहेरचे अंगास जो पन्हळ आला आहे तोच किती तरी फूट लांब आहे. देवळाचें शिखर २१६ फूट उंच आहे. शिखराचा जो दगड आहे तो प्रचंड असून त्याचें वजन ११२ खंडी आहे. हा दगड शिखरावर चढविण्याकरितां तंजावरापासून ४ मैलावर सारापुलम म्हणून खेडें आहे. तेथून मातीची चढण बांधीतबांधीत शिखरापर्यंत आणली व त्या चढणीवरून हा दगड ढकलीत ढकलीत शिखरावर आणून बसविला. हें शिखर बांधण्याचें काम १२ वर्षे चाललें होतें म्हणतात. देवळाभोंवतालचें पटांगण फार विस्तीर्ण असून स्वच्छ राखिलेलें आहे.

नंतर आम्ही **राजवाडा** पहाण्यास गेलों. राजवाडा मोठा असून मुख्य इमारत ५ मजली आहे व तिची उंची ९० फूट

आहे. ह्या वाड्यांत एक दरबार भरविण्याचा दिवाणखाना आहे. त्यांत काळ्या ग्रॅनाइटचा चौथरा करून त्यावर व्यंकोजीच्या वंशांतील एका **शिवाजी** नांवाच्या राजाचा पुतळा उभा केला आहे, तो पांढऱ्या संगमरवरी दगडाचा केलेला आहे. दोन्ही हात जोडून आलेल्यास शिवाजीराजे नमस्कार करताहेत असा ह्या पुतळ्याचा देखावा आहे. ह्याचें पागोटें फार जड झालें म्हणून तें काढून ठेविलें आहे व त्याचेजागीं हलकें पागोटें घातलें आहे. ह्या पुतळ्याचे डावे अंगास लार्ड नेल्सनसाहेबांचा बस्ट आहे.

दुसऱ्या एका चौकांत आणखी एक मोठा दिवाणखाना आहे. त्याचे मध्यभागीं सिंहासन होतें म्हणतात; पण आतां त्याचे जागीं एक मोठी खुर्ची ठेविली आहे. या दिवाणखान्याच्या भिंतीवर तंजावरास होऊन गेलेल्या राजांचीं चित्रें काढलेलीं आहेत.

ह्या दिवाणखान्याचे बाहेरचे अंगास **सरस्वती महाल** म्हणून एक **लायब्ररी** आहे. तींत १८००० संस्कृत हस्तलिखित ग्रंथ आहेत. पैकीं ८००० ताडपत्रावर लिहिलेले आहेत. एवढी मोठी संस्कृत ग्रंथांची लायब्ररी कोठेंच नाहीं म्हणतात.

ह्या चौकांतून बाहेर पडतांना त्याचे तोंडाशीं एक लहानशी खोली आहे. तींत निरनिराळ्या प्रकारचीं जुनीं हत्यारें ठेविलेलीं आहेत. कांहीं तरवारीच्या मुठी सोन्यारुप्याच्या आहेत. लहान तोफा, बंदुका, हौदे, हत्तीच्या झुली, व भरजरीचे पोषाख ठेविलेले आहेत.

नंतर आम्ही **तासामोड** म्हणून एक ठिकाण आहे तें पहाण्यास गेलों. तेथें एक तोफ आहे ती विजापुरच्या मुलूखमैदान

तोफेइतकी जरी मोठी नाहीं तरी बरीच मोठी आहे. तिची लांबी २५ फूट आहे व पोकळीचा व्यास दोन फूट आहे.

किल्ल्याचे बाहेर एक **घड्याळाचा** मोठा **टावर** आहे. हा अलीकडे म्हणजे १८८३ सालीं बांधला. ह्या टावरच्या उत्तरेस **राजा मिरासदार इस्पितळ** आहे. तंजावरापासून ७ मैलांवर कावेरी तीरावर **तिरुवल्ली** म्हणून एक गांव आहे. येथें एक शिवाचें देऊळ आहे. येथ मरण आलें असतां मुक्ति मिळते असा समज असल्यामुळें म्हातारे कोतारे ब्राम्हण आपल्या आयुष्याचे शेवटले दिवस काढण्याकरितां येथें जाऊन रहातात. म्हणून येथील वस्ती बरीच ब्राह्मणांची आहे. आम्हांस सवड नसल्यामुळें हें ठिकाण आम्हीं पहाण्यास गेलों नाहीं. भद्रेश्वराचें देऊळ, राजवाडा व तोफ पाहून आम्हीं बिऱ्हाडीं आलों व स्वयंपाक झाल्यावर जेवणखाण आटोपून मदुरेला जाण्याकरितां निघालों. वाटेंत त्रिचनापल्ली लागली. पण येतांना तें शहर पहावयाचें असा बेत असल्यामुळें, मदुरेस गेलों. तेथें रात्रीं १२ वाजतां जाऊन पोंचलों. अपरात्र झाल्यामुळें जेवणखाण, फराळ कांहीं न करितां एका छत्रींत उतरलों व झोंपीं गेलों.

मदुरा.

ता. २७ रोजीं सकाळीं उठून **मीनाक्षीचें** देऊळ पहाण्यास गेलों. ह्या देवीचा महिमा असा आहे कीं,

पंचकाक्षी मदुरामीनाक्षी काशी शालाक्ष ॥
साक्षी माक्षिका–रक्षिका गोविंद ॥

मीनाक्षीचें देऊळ गांवचें मध्यभागीं आहे. देवालयाचे आवारांत दोन मुख्य मंदिरें आहेत. एक **मीनाक्षीचें** व दुसरें **सुंद्रेश्वराचें.** देवळांत पूर्वेकडून शिरावें म्हणजे प्रथम अष्टलक्ष्मीचा मंडप

लागतो. या अष्टलाक्ष्मि खांबावर काढून त्यांनीं वरील मंडपाला हात लावून तो सावरून धरिला आहे, असें दाखविलें आहे. त्याचे वरल्या अंगांस चित्रें काढिलीं आहेत. मीनाक्षीचा जन्म, तिचें शंकराशीं युद्ध, तिचा त्यांच्याशीं विवाह, सुब्रह्मण्य यांचा जन्म अशीं चित्रें आहेत. ह्या मंडपांतून पुढें गेलें म्हणजे एक दरवाजा लागतो. त्याचे बाहेरचे अंगास एका बाजूला सुब्रह्मण्य यांची सहा तोंडें असलेली मूर्त आहे व दुसऱ्या बाजूला गणपतीची मूर्त आहे.

दरवाजा ओलांडून आंत गेलें म्हणजे उजवे अंगास शंकराची मूर्त आहे व डावे अंगास मीनाक्षीची मूर्त आहे. दोघेंही शिकार करितात असें दाखविलें आहे. पुढें एक मंडप लागतो. त्यांत वाटेचे दोन्ही अंगास किरकोळ दुकानें बसतात. हा मंडप संपला म्हणजे एक पितळेचा दरवाजा लागतो. त्यावर शेंकडो पणत्या काढलेल्या आहेत. व ह्यांत तेलवात करून रात्रीं दिवे लावतात तेव्हां मौज दिसते. दरवाजाचे आंत गेलें म्हणजे एक मंडप लागतो. त्यांत अंधेर आहे. ह्या मंडपांत दोन्ही बाजूला शंकराचीं दगडी चित्रें काढिलेलीं आहेत. हा मंडप ओलांडून पुढें आंत गेलें म्हणजे डावे अंगांस **पोटामारीचें** तीर्थ लागतें. हें पवित्र तीर्थ आहे म्हणून त्यांत आम्हीं स्नान केलें. या तीर्थाचे पश्चिमेकडील व दक्षिणकडील ओवऱ्यांतून शिवानें मदुरेस जे जे चमत्कार करून दाखविले त्यांचीं भिंतीवर चित्रें काढलीं आहेत. ह्या ओवऱ्यांतून पुष्कळ दगडी पुतळे आहेत. आंत गेलें म्हणजे मीनाक्षीचें देऊळ लागतें. मीनाक्षीचे अंगांवर हिरेमाणकांचे दागिने आहेत. देवळाच्या गाभाऱ्याच्या बाहेर पांच पांडवाच्या मूर्ति आहेत. पलीकडे **सुब्रह्मण्य** यांचें देऊळ आहे. ह्या देवळास जातांना वाटेंत सुग्रीव व वाली यांचे पुतळे आहेत. तसेंच हरिश्चंद्र व तारामती यांचे पुतळे आहेत. सुब्रह्मण्य यांच्या मंदिराचा दरवाजा

बंद होता म्हणून देवमूर्ति आम्हांस पहाण्यास मिळाली नाहीं. पुढें जरा गेलें म्हणजे गणपतीची मूर्त लागते. ही बरीच मोठी आहे.




मदुराचे देवळांतील गणपतीची मूर्ति.

पुढें नवग्रहांच्या मूर्ति आहेत. नंतर सुंद्रेश्वराचें देऊळ लागतें. ह्यांतील मूर्त नटेश्वराचें रूपानें आहे. ह्या देवळाचे पुढील दरवाजानें बाहेर पडावें म्हणजे एक आठ खांबी मंडप लागतो.

त्यावर शंकराचीं चित्रें आहेत. एक नंदी व एक सोनेरी दीपस्तंभ आहे. त्या मंडपाचे बाहेर पडले म्हणजे उजवे अंगास दोन खांब आहेत व डावे अंगास दोन आहेत. डाव्या खांबावर शंकरानें दक्षाचा संहार केल्याचें चित्र आहे. व उजवे खांबावर शिव व काली हीं नृत्य करिताहेत असें दाखविलें आहे. ह्याचे शेजारींच एका मंडपांत रुप्याचीं वहानें ठेवलेलीं आहेत. ह्या मंडपांतून बाहेर पडून उजवे अंगास वळलें म्हणजे एक सुंदर मंडप लागतो. ह्याला विवाहसमारंभ मंडप म्हणतात. येथें उत्सवाचे वेळीं सुंद्रेश्वराचें व मीनाक्षीचें लग्नाचा सोहळा होतो. ह्या मंडपाची तक्तपोशी लाकडाची केलेली आहे. मद्रास इलाख्यांतील कोणत्याही देवळांत लाकूडकाम म्हणून मिळावयाचें नाहीं. जिकडेतिकडे दगडच दगड. दगडाच्या मोठमोठ्या तुळया, खांब, फळ्या सर्व कांहीं दगडाचें. ह्या मंडपाची तक्तपोशी लाकडाची पाहून नवल वाटलें. ह्या मंडपांतून पुढें गेलें म्हणजे डावे अंगास एक हजारखांबी मंडप लागतो. ह्या मंडपाचे पुढलें अंगास खांबावर पुष्कळ नक्षीकाम करून अनेक दगडी पुतळे कोरलेले आहेत. देवळाचा प्राकार फार मोठा असून स्वच्छ असतो. मीनाक्षीच्या व सुंद्रेश्वराच्या देवळावरील भाग सोन्याच्या पत्र्यांनीं मढविलेला आहे. ह्या देवळाचे चारीही बाजूला गोपुरें आहेत व तीं मोठीं आहेत. देवळांत शिरलेल्या दरवाजानेंच बाहेर पडून रस्ता ओलांडावा म्हणजे ' पथु ' नांवाचा मंडप आहे. हा त्रिमुलनाईक यांनीं बांधिला. हा अपुराच राहिलेला आहे. हा पुरा झाला असता तर फार शोभिवंत इमारत झाली असती. ह्या मंडपांत त्रिमुलचा पुतळा आहे. मंडपाचे चारी बाजूला पडव्या आहेत त्यांत बाजार भरतो. ह्या मंडपांत व पडव्यांतून कोरींव काम फार सुबक केलें आहे.

नंतर आम्ही गांवापासून एक मैलावर **त्रिमुल्लनाईक** यांचा वाडा आहे तो पहाण्याकरितां झटका करून गेलों. ह्या वाड्याचे



त्रिमुल्ल नायकांचा वाडा, मदुरा.

खांब दगडाचे असून त्यावर चुन्याचें सीमेंट केलेलें आहे. हे खांब फार मोठे आहेत. समोरील दिवाणखाना चौसोपी आहे. त्यांत

जज्जसाहेबांचें कोर्ट भरतें. या कोर्टाचे डावे अंगास एक दिवाणखाना आहे. यांत त्रिमुलनायकाचें शयनगृह असे. ह्या दिवाणखान्याच्या तक्तपोशीला चार बाजूला चार मोठालीं भोकें आहेत, शिवाय आणखी एक पांचवें दक्षिण कोपऱ्याला आहे. ह्या भोंकाबद्दल अशी आख्यायिका आहे कीं चार भोंकांतून दोऱ्या टांगून त्यांना त्रिमुलनायकांचा छप्परपंलग टांगीत असत. पांचवें जें भोंक आहे तें एका चोरानें पाहून त्यांतून खालीं येऊन त्यानें सर्व जवाहीर पळवून नेले. जो जवाहीर परत आणून देईल त्याला वंशपरंपरे एक जहागीर बक्षीस मिळेल असें जाहीर केल्यावरून त्या चोरानें ते सर्व जवाहीर आणून दिले. त्याप्रमाणें त्या चोराचे वंशांकडे जहागीर चालू केली, पण त्या चोराचा शिरच्छेद केला.

ह्या राजवाड्यांत आणखीही कांहीं कचेऱ्या भरतात व रेकार्ड ठेवितात. हा वाडा फार उंच व भव्य आहे. ह्याला पुष्कळ कमानी आहेत. हा राजवाडा पाहून आम्ही परत आलों व स्वयंपाक झाल्यावर भोजन केलें व पुन्हां मीनाक्षीचे देवळांत गेलों. पण ह्या दिवशीं पौर्णिमा असल्यामुळें सकाळीं १० वाजतां देवांची पालखी निघून गांवापासून ३ मैलावर तेफ्या–कुलम तीर्थ आहे तेथें देव गेले असें समजलें व त्यामुळें देवळाच्या आंतील दरवाजे बंद केलेले होते. तेफ्या–कुलम तीर्थावर देवाची पूजाअर्चा होऊन तीर्थांत नांवेवर देवाचा रथ घालून फिरवितात व लाइट व दारूकाम पुष्कळ होतें असें कळल्यावरून एक झटका करून आम्हीं तेफ्या–कुलमला निघालों.

तेफ्या–कुलमचे वाटेंत एक वटवृक्ष आहे. हा फार मोठा आहे. त्याला पारंब्या फुटून त्याचा फार विस्तार झाला आहे. मुख्य झाडाचा बुंधा ६०।७० फूट असेल. सर्व झाडें मिळून वर्तुळाकार झाला आहे. त्या वर्तुळाची त्रिज्या १५०।१७५ फूट आहे. कबीर

वटवृक्षापेक्षां हा **वटवृक्ष** पुष्कळ लहान येईल. पण एवढा वटवृक्ष सुद्धां क्वचितच पहावयास सांपडतो. सातारा जिल्ह्यांत मर्ढ्यांच्या रानांत एक वटवृक्ष आहे, व मद्रास जवळ अड्यार एथें एक आहे. ह्याचें वर्णन वर आलेंच आहे. नंतर आम्हीं **तेप्प्या–कुलमला** गेलों. तों या तीर्थाचे सभोंवतीं माणसांची अगदीं चिकार गर्दी झाली होती. बहुतेक सर्व मदुरा गांव व आसपासच्या खेड्यांतील लोक पालखी बघण्याकरितां आले होते. हें तीर्थ फार मोठें आहे. आजपर्यंत जीं आम्ही तीर्थें पाहिलीं त्यांत एवढें तीर्थ पहाण्यांत आलें नाहीं. कुंभकोणमचें महामहतीर्थ व शिवकांचीचें सर्वतीर्थ हींही मोठीं आहेत पण हें फारच मोठें आहे.

हें तीर्थ **वैगई** नदीचे कांठीं आहे. हें त्रिमुलजी नाईकांनीं बांधिलें. दक्षिणेकडील तीर्थांत तीर्थाचे मध्यभागीं एक चौथरा बांधिलेला असतो. त्याप्रमाणें या तीर्थांतही चौथरा आहे. इतकेंच नाहीं तर त्या चौथऱ्यावर एक इमारत असून त्या इमारतीचे सभोंवार बाग केली आहे. एवढा हा चौथरा आहे. तीर्थ मोठें त्या मानानें चौथराही मोठा. ह्या चौथऱ्यावरील इमारतींतच उत्सवमूर्ती दुपारीं पालखींतून आणून ठेवल्या होत्या.


आम्ही संध्याकाळीं तेप्प्या–कुलमला गेल्यावर प्रथम जवळच असलेली **वैगई** नदी पहाण्यास गेलों. आदले दिवशीं वर पाऊस पुष्कळ पडला होता म्हणून ह्या नदीला पाणी आलें होतें. नदीचे कांठीं दूरदूरचे आलेले लोक फराळाचें खात बसले होते. नंतर त्या तीर्थाला एक प्रदक्षिणा घातली. तीर्थाचे चारी बाजूला लोकांचे थवेचे थवे बसले होते. आंतील चौथऱ्यावर पुजारी वगैरे मंडळी गेलेली होती. चौथऱ्यावर नावेंत बसून जावें लागतें. आम्हांस जाण्याची इच्छा झाली पण गर्दी मनस्वी होती. तरीपण त्यांतूनच मार्ग काढून आम्ही गेलों. माणशीं आठ आठ आणे

घेतले. रात्र झालीच होती पण पौर्णिमा असल्यामुळें चांदणें स्वच्छ पडलें होतें. चौथऱ्यावर सभोंवार, चौथऱ्यावरील इमारतीचे गच्चीवर, तीर्थाचे चारही बाजूला पणत्यांच्या रांगाच्या रांगा तेलवात करून ठेविल्या होत्या. दहा हजार तरी त्या असतील. रात्र पडल्याबरोबर त्या सर्व पेटविल्या. तेव्हां जिकडे तिकडे दिवेचदिवे दिसूं लागले व त्या दिव्यांचे पाण्यांत प्रतिबिंब पडलें होतें. त्यामुळें त्या तीर्थाला फारच रम्य व मनोहर शोभा आली होती. आठ वाजतां मूर्तींची पूजाअर्चा चालू झाली. कित्येक गृहस्थांनीं हारतुरे व इतर पूजेचें सामान पुजाऱ्याजवळ देऊन देवांची पूजा करवली. आरती वगैरे झाल्यावर नावांवर लाकडी देऊळ तयार केलेलें होतें त्यांत मूर्ती आणून ठेविल्या. ह्या देवळासमोर नावांवरच मंडप तयार केला होता त्यांत हंड्या झुंबरें लाविलीं होतीं. नंतर त्या तीर्थांत चौथऱ्याभोंवतीं त्या नांवेवरील देवळांतील देवांनीं एक प्रदक्षिणा घातली. व मग एका कांठाशीं तें देऊळ येऊन उभें राहिलें. मग कांठावर दारूकाम सुटलें. नंतर मूर्तींना पालख्यांत आणून बसविलें. त्या मुर्ती तीन होत्या. सुंद्रेश्वर, मीनाक्षी आणि सुब्रह्मण्य. मग त्या पालख्या मिरवीतमिरवीत गांवांत रात्रीं १२वाजतां येऊन पोंचल्या. आम्ही लवकर परत बिऱ्हाडीं येऊन स्टेशनावर गेलों व बारा वाजतां गाडींत बसून रामेश्वरास जाण्यास निघालों.

रामेश्वर.

ता. २८ ला रामेश्वराला सकाळीं ९ वाजतां येऊन पोंचलों. येथें यजमानाकरितां उपाध्यांनीं धर्मशाळा बांधून ठेविल्या आहेत. अन्नछत्रेंहि आहेत. आम्ही आमच्या उपाध्याच्या धर्मशाळेंत एक खोली घेऊन राहिलों. उतरल्याबरोबर एक मैलावर लक्ष्मणकुंड म्हणून तीर्थ आहे. त्या तीर्थावर गेलों. तेथें क्षौरविधि आटोपला. येथें कांहीं मद्रासी सवाष्णी आल्या होत्या. त्यांनींहि

क्षौर करविलें हें पाहून आम्हांस नवल वाटलें. बायांचे केस



रामेश्वराचें देऊळ.

काढण्याचें काम एक न्हावीण करीत होती. हा प्रकार फार चांगला आहे. नाहीतर आपल्या इकडे विधवा स्त्रियांची ह्या कामांत फार

शोचनीय स्थिति आहे. पुरुषांकडून अनाथ विधवेनें एकाद्या खोलींत जाऊन श्मश्रू करून घ्यावयाची हा अत्यंत निंद्य प्रकार आहे. आपल्या इकडील न्हाव्यांच्या बायका हा धंदा उचलतील तर फार चांगलें होईल. रामेश्वरीं तरी अशी एकच बाई दिसली. बाकी सर्व न्हावीच बायकांचे सुद्धां केस काढीत होते. असो. क्षौरविधि आटोपल्यावर आम्ही परतलों. वाटेंत रामतीर्थ लागलें. ह्या तीर्थानें मार्जन करून रामेश्वराचें दर्शनास गेलों. रामेश्वराचे देवळाला तीन प्राकार आहेत. रामेश्वराचें देवालयही फार जुनाट भव्य दगडी इमारत आहे. बाहेरच्या प्राकाराची लांबी हजार फूट असेल व रुंदी ६००।७०० फूट असेल. ह्या प्रकारांतून एक प्रदक्षिणा केली तर अर्ध्या मैलापेक्षां जास्त चाल होते एवढें हें मोठें देवालय आहे. ह्या देवालयांत सिद्धिविनायक, नंदिकेश्वर पार्वतीमाता, नवग्रह, मारुती यांचीं मंदिरें आहेत. येथील नंदीही फार मोठा आहे. हा रामेश्वराचे मुख्य मंदिराचे दरवाजाबाहेर व देवाचे समोर आहे. यानें ही बैठकच घातली आहे पण माने-वरून जीभ बाहेर काढलेली आहे. हाही एक दगडाचा असावा पण वरून चुन्याचें प्लॅस्टर केलेलें आहे. त्याची लांबी, रुंदी, ऊंची त्रावणकोरचे नंदीएवढीच असावी. नंदीचें दर्शन घेऊन आंत गेलें म्हणजे सभामंडप लागतो. तो फार भव्य व मोठा आहे. ह्याचे दगड ४०।४० फूट लांबीचे आहेत. ह्या मंडपांत लोकांनीं रामेश्वरावर घालण्याकरितां आणलेल्या गंगांचें पूजन चाललेलें असतें. सभामंडपाचे खांबावर बहुत नक्षी आहे. देवळाचे गाभाऱ्यांत जाऊन दर्शन घेण्यास एक रुपया फी आहे, गंगा घालण्यास २ रुपये फी आहे, नारळ अर्पण करण्यास एक आणा फी आहे,फुलें दूर्वा घालण्यास एक आणा फी आहे. म्हणजे ज्या त्या गोष्टीला फी ठेवून देवाचें उत्पन्न सालीना सवालाखाचें केलें आहे.

देवाची पिंडी शाळुंकेच्या मानानें बारीक आहे व बरीच



सभा-मंडपाचे आंतील भागाचा देखावा.

लांबट आहे. ह्या पिंडीचे मागें उत्सवमूर्त आहे. तिच्यावर जवा-
हिराचे दागिने आहेत. मुख्य मंदिराचे डावे अंगास पण सभा-

मंडपांतच देवाचें लहानसें देऊळ आहे व उजवे अंगास गणपतीचें देऊळ आहे. डावें अंगास ओवरींत देवाचें देऊळ आहे. आंतले प्राकारचे बाहेर उजवे अंगास दुसऱ्या प्राकारांत पार्वतीचें मंदिर आहे. या सर्व देवांचें दर्शन घेऊन आम्ही बिऱ्हाडीं आलों. क्षौर केलेल्या दिवशीं उपवास करायवाचा असतो. म्हणून बाजारांतून केळीं, लिंबें, शहाळीं आणलीं व त्यावर दिवस काढला. रात्रीं शेजारतीला गेलों. देवपूजा वगैरे करून उत्सवमूर्ती पालखींत घालून देवळाचे अवारांत मिरवून पार्वतीचें देऊळ व रामेश्वर मंदिर यांचे दरम्यान शय्यागृह आहे तेथें पालखी आणतात. व मग उत्सवमूर्तीला शय्यागृहांत आणून ठेवतात. येथें पूर्वींच पार्वतीला आणून ठेवतात. मग दोन्ही देवतांची पूजा करून प्रसाद वाटून शय्यागृहाचे दरवाजे बंद करितात. नंतर आम्हीही आमच्या बिऱ्हाडांतील शय्यागृहांत जाऊन निजलों. सकाळीं काकडारती होते.

ता. २९ रोजीं उठल्यावर प्रातर्विधि आटोपला. रामेश्वरीं २४ तीर्थें आहेत. त्यांचे स्नानास गेलों. त्या २४ तीर्थांपैकीं बहुतेक तीर्थें म्हणजे देवळाचे आवारांत काढलेले कुवे होत. प्रथम महादेवतीर्थ लागलें. हा तलाव आहे. त्याचे पाणी बाहेर काढून स्नान करावें लागतें. नंतर दुसरें तीर्थावर गेलों. हा कुवा आहे.यांतील तीर्थ दोरी लावून तांब्यानें काढावयाचें व तें अंगावर घ्यावयाचें. याप्रमाणें ओलेत्यानें एकेक तांब्या प्रत्येक तीर्थावर घेत घेत १३ व्या समुद्रतीर्थावर आलों. समुद्रस्नान करून पुन्हा इतर तीर्थस्नानें करीत करीत पार्वतीचें मंदिराचे बाहेर २३ वें पार्वतितीर्थ आहे तेथें स्नान करून २४ वें कोटितीर्थ लागतें. याचें स्नान जावयाचे दिवशीं करावयाचें असतें. नंतर देवदर्शन करून बिऱ्हाडीं परत आलों. ह्याच दिवशीं श्राद्ध केलें. सर्व

पितरांचे नांवानें पिंड घालून पिंडदान झाल्यावर भोजन केलें. व मग संध्याकाळीं रामेश्वरापासून एक मैलावर गंधमाधव पर्वत आहे, तेथें गेलों. येथें एका मंदिरांत रामाच्या पादुका आहेत. त्यांचें दर्शन घेतलें. त्याचेवर दुमजला काढलेला आहे. त्यावर उभे राहिले असतां गांवची व आजूबाजूची शोभा दिसते. त्या स्थानास रामझुरका असें म्हणतात. नंतर रामझुरक्याहून परत आलों. आज श्राद्ध केलेलें असल्यामुळें जेवणास उशीर झालेला होता. सकाळचीं स्नानें व रामझुरक्यास पायीं जाणें— रामझुरक्याला पायीं व अनवाणी गेलें पाहिजे असें आहे—व आदल्या दिवशींचा उपवास या सर्व गोष्टींनीं इतका थकवा आला होता कीं बिऱ्हाडीं येऊन जों पडलों तों उजाडलें केव्हां हें समजलें नाहीं.

ता. ३० रोजीं प्रातर्विधि आटोपून रामतीर्थावर स्नानास गेलों. स्नान करून आल्यावर हरिद्वाराहून गंगा आणिली होती तिची पूजा करून ती रामेश्वरावर घातली व ते देवशीं ब्राह्मण-सवाष्ण घालून नैवेद्य आटोपून भोजन केलें. तिसरे प्रहरीं धनुष्य-कोटीवर जाण्याकरितां स्टेशनवर आलों. रामेश्वराहून धनुष्यकोटी स्टेशन ११ मैल लांब आहे. मध्यें दुसरें स्टेशन नाहीं.

सीलोन (लंका)

सीलोनला जावयाचें असलें म्हणजे धनुष्यकोटी स्टेशनवर उतरावें लागतें. धनुष्यकोटी हें बंदर आहे. येथें आगबोटींत बसून सीलोन बंदर आहे तेथें जाण्यास सारे २॥ ते ३ तास लागतात पूर्वी टिटीकोरीनहून कोलंबोला जावें लागे व तो बोटीचा प्रवास फार मोठा होत असे. पण रामेश्वर व धनुष्यकोटी त्या ठिकाणांना आगगाडी झाल्यापासून सीलोनला जाणें फार सोपें झालें आहे. आमचाही सीलोनला जाण्याचा बेत होता, पण पास पाहिजे, त्याशिवाय

बोटीवर चढूं देत नाहींत. व तो मंडपमहून डाक्तरकडून आणला पाहिजे व त्यांनीं दिला तर बरें. शिवाय लंकेंत गेल्यावर तपासणी, कारंटाईन वगैरे कटकटी आहेत असें ऐकल्यावरून त्या वेळीं सीलोनला जाण्याचा नाद टाकून दिला. व धनुष्यकोटीला गेलों.

धनुष्यकोटी.

स्टेशनपासून दोन समुद्रांचा जेथें संगम झाला आहे व जेथें स्नानें करून सेतु आणावयाचा असतो तें ठिकाण दोन मैलांवर आहे तेथें आम्ही गेलों. येथें बैराग्यानें एक झोंपडी बांधिली आहे. त्या झोपडींत जाऊन निजलों. व दुसरे दिवशीं म्हणजे ता. ३१ ला समुद्रावर स्नानास गेलों. येथें अरबी महासागर व बंगालचा उपसागर यांचा संगम झाला आहे. दोहोंकडून समुद्र व आपण मध्यें उभे राहिलें म्हणजे मौज वाटते. आजपर्यंत नद्यांचे पुष्कळ संगम पाहिले होते, पण समुद्रांचा संगम कधीं पाहिला नव्हता तो पाहून फारच मौज वाटली.

येथें कोणी तीन तर कोणी बारा तर कोणी ३६ स्नानें करितात. एक स्नान करून किनाऱ्यावर यावयाचें, मंत्र वगैरे म्हणावयाचे व हातांत सेतु घेऊन तो संगमांत नेऊन टाकावयाचा आणि बुडी मारावयाची, याप्रमाणें ३६ वेळां केलें. नंतर समुद्राची पूजा करून एका पंचांत सेतु घेऊन धनुष्यकोटी स्टेशनावर आलों व मग गाडींत बसून रामेश्वरास आलों. नंतर सेतु व पूजेचें सर्व सामान घेऊन रामेश्वराचे देवळाचे आवारांत सेतुमाधवाचें देऊळ आहे तेथें गेलों. बरोबर आणलेल्या सेतूचे तीन भाग करून त्यांची पूजा केली व दोन भाग ब्राह्मणास दान देऊन एक भाग नारळाचें बेलें घेऊन त्यांत भरला व भोक बंद करून सेतुमाधवाचें पायावर ठेवून पूजाअर्चा करून प्रसाद घेतला. आतां हा सेतु प्रयागास त्रिवेणी संगमांत यथाविधि पूजा करून टाकिला

म्हणजे यात्रा समाप्त होईल. सेतुमाधवाची मूर्ति शंखाची आहे. या सेतुमाधवाबद्दल अशी कथा आहे कीं हे सेतुमाधव नित्य प्रयागास कावड घेऊन जावयाचे, व तेथून गंगा रामेश्वरास आणून ती देवावर घालावयाची व पुन्हा प्रयागास जावयाचे. अशा नित्य येरझाऱ्या घालीत. तेव्हां देव प्रसन्न होऊन सेतुमाधवांना म्हणाले कीं, तुम्ही अशा नेहमीं येरझाऱ्या घालतां हें आम्हांस अवघड वाटतें. त्यावर सेतुमाधव म्हणाले कीं, हें मी तुमचेकरितां करीत नाहीं माझेकरितां करतों. देव म्हणाले, तरी आम्हांस उपकाराचा भार होतो. म्हणून तुमचे पायांत आम्ही बेडी घालूं. व त्याप्रमाणें त्याचे पायांत बेडी घातली. तेथेंच सेतुमाधव उभे राहिले व जेथें उभे राहिले तेथें हें देऊळ बांधिलें आहे. सेतुमाधवाचे खांद्यावर कावड आहे. देवदर्शन करून बिऱ्हाडीं येऊन स्वयंपाक करून भोजन केलें. याप्रकारें ही रामेश्वरयात्रा झाली. रामेश्वराचे देऊळाचा पाया राम वनवासांत असतां त्यांनीं घातला व त्यांनींच लिंगाची स्थापना केली, अशी कथा आहे.

ता. १ फेब्रुवारी रोजीं सकाळीं उठून प्रातर्विधि आटोपून **कोटीतीर्थावर** स्नानास गेलों व तेथून स्नान करून येऊन उपाध्येबुवांची पूजा करून त्यांस बिदागी दिली व स्वयंपाक करून भोजन करून स्टेशनवर गेलों व आगगाडींत बसून त्रिचनापल्लीला जाण्याकरितां निघालों. पूर्वी मंडपमपर्यंतच आगगाडी होती व तेथून रामेश्वरास नावेंतून यावें लागे. मध्यें एक मोठी खाडी आहे. त्या खाडीवर आतां मोठा पूल बांधला आहे. या खाडीवरच पूर्वीं **रामांनीं बांधलेला सेतु** होता म्हणतात. अजून ह्या ठिकाणीं मोठमोठे दगड दृष्टीस पडतात. वाटेंत रामानंद स्टेशन लागलें. या स्टेशनापासून उत्तरेस १० मैलांवर **नवपाषाण** म्हणून एक पवित्र स्थान आहे. तेथें राम, लक्ष्मण, नळ जांबुवंत यांच्या मूर्ति आहेत.

व रामानंदाचे दक्षिणेस आठ मैलांवर **दर्भशयन** म्हणून एक स्थान आहे. या ठिकाणीं राम सीताशुद्धीकरितां फिरत फिरत आले. व येथें ७ दिवस निराहार करून समुद्राची प्रार्थना केली. त्या वेळीं येथें निजण्याबसण्याला दर्भाची शय्या केली होती, म्हणून या स्थानास दर्भशयन असें नांव पडलें आहे. आम्ही रामानंद स्टेशनवर उतरलों नाहीं व या दोन्हीं ठिकाणीं गेलों नाहीं. त्रिचनापल्लीला येत असतां वाटेंत मदुरा स्टेशन लागलें; पण येथें आम्ही जातांना उतरलों होतोंच म्हणून तसेंच पुढें चाललों, वाटेंत एक दिंडूगल स्टेशन लागलें. हें पूर्वी मदुराप्रांताच्या राजधानीचें शहर होतें. येथें एक जुना किल्ला आहे. हा आगगाडींतून दिसतो. दिंडूगलला तंबाकूच्या चिरूट करण्याचा कारखाना आहे. शेतांतून तंबाखू आणल्यापासून तों चीरूट करीपर्यंत सर्व प्रकार त्या कारखान्यांत होतात. येथून ३० मैलांवर **पाळणी** म्हणून एक क्षेत्र आहे. येथील नैवेद्याची अशी आख्यायिका आहे कीं हा नैवेद्य किती दिवस ठेवला तरी नासत नाहीं. आम्ही येथेंही न उतरतां तडक त्रिचनापल्लीला गेलों. येथें आगगाडी बदलावी लागते. ती बदलून दुसऱ्या गाडींत बसलों व त्रिचनापल्ली फोर्ट स्टेशनावर रात्रीं ८ वाजतां आलों. स्टेशनाजवळच एक धर्मशाळा आहे. तेथेंच बहुतेक उतारू उतरतात. गांवांतही धर्मशाळा आहेत.

त्रिचनापल्ली.

तारीख २ रोजीं उठल्यावर झटका करून **श्रीरंगास** जाण्याकरितां निघालों. श्रीरंगक्षेत्र त्रिचनापल्ली किल्ल्यापासून तीन मैलांवर आहे. वाटेंत कावेरी नदीवर पूल लागतो. पुढें श्रीरंगाचें जरा अलीकडे कावेरी पश्चिमवाहिनी झालेली आहे. येथें घाट बांधिलेला आहे. पश्चिमवाहिनी नदीवर स्नान करणें फार पवित्र मानतात.

म्हणून येथें स्नान करून मग आम्ही श्रीरंगास गेलों. श्रीरंगाचें देवालय इतकें मोठें आहे कीं सर्व हिंदुस्थानांत इतकें मोठें देऊळ नाहीं. याला सात प्राकार आहेत. व बहुतेक सर्व गांव या प्राकारांत वसलें आहे म्हटलें तरी चालेल. व्यापारटापार सर्व कांहीं त्या प्राकारांत चालतो. १५ हजार वस्ति त्या प्राकारांत आहे. बाहेर ४।५ हजार वस्ति असेल. अगदीं बाहेरचा जो प्राकार आहे त्याची भिंत १६ फूट रुंद आहे. व प्राकाराची लांबी दोन मैलांवर आहे. देवालयाचे प्राकारांत देवाच्या दिवाणाचें एक देऊळ आहे, अमननायकी म्हणून एक लक्ष्मीचें देऊळ आहे, एक नरसिंहाचें देऊळ आहे, व एक तीर्थ आहे. व त्या तीर्थावर एक उंडीचें झाड आहे.

मुख्य देऊळ श्रीरंगाचें आहे. श्रीरंग हे शयन केलेले आहेत. दहा एक फूट तरी ही मूर्ति असावी. उत्सवमूर्ति सोन्याची आहे. देवासमोरील सभामंडप मोठा आहे. व त्या मंडपांत देवासमोर गरुडाची मूर्ति आहे. ही गरुडाची मूर्ति फार भव्य व मोठी आहे. देवळाचें शिखर सोन्याचें आहे. एकंदर या देवळांत १५ गोपुरें आहेत, पण तीं लहान आहेत. त्या देवळाचा विस्तार मोठा पण नक्षीकाम वगैरे कांहीं नाहीं. मदुरेचें देऊळ जसें शोभिवंत दिसतें तशी येथें कांहीं शोभा नाहीं, पण देवाचे दागिने इतके मौल्यवान् आहेत कीं त्यांची किंमत कित्येक लाख रुपये होईल. त्यांत एक तबक जेव्हां १८८५ सालीं एडवर्ड बादशहा प्रिन्स ऑफ वेल्स ह्या नात्यानें आले होते तेव्हां त्यांनीं देवास अर्पण केलेलें आहे. हे दागिने पहाण्याला १५ रुपये फी पडते. तेव्हां ते आम्हांस पहावयास मिळाले नाहींत हें सांगणें नकोच. आदले दिवशीं युनिव्हर्सिटी कमिशनवरील डॉक्टर मुकर्जी येथें आले होते, त्यांनीं

फी देऊन ते पाहिले. आम्ही एक दिवस अगाऊ आलों असतों तर त्यांचेबरोबर पहावयास मिळाले असते. असो.

श्रीरंगाचे देवळापासून एक मैलावर जंबुकेश्वराचें देवालय आहे. हें पहाण्यास आम्ही गेलों. हें देऊळ एका जांभळीचे झाडाखालीं आहे म्हणून त्याला जंबुकेश्वर नांव पडलें असावें. देवळाचा मंडप फार उंच आहे. देवाचीं वहानें लांकडाचीं आहेत, पण रंगीत असून सुबक आहेत. देवळाचे बाहेर एक धर्मशाळा आहे. ती फार मोठी आहे. अशीच एक त्रिचनापल्ली येथें आहे.

हें सर्व पाहून आम्ही बिऱ्हाडीं आलों व जेवणखाण आटोपल्यावर त्रिचनापल्लीला एक किल्ला आहे तो बघण्यास गेलों. हा किल्ला एका उंच टेकडीवर बांधलेला आहे. हा गांवांतच आहे. वर चढण्याला प्रशस्त पायऱ्या आहेत. ३७ पायऱ्या चढून गेल्यावर मग वस्ति आहे. पुढें ४८ पायऱ्या चढून गेल्यावर वाटेचे दोन्ही अंगांस भव्य मंडप आहेत. यांचे छतांचे नक्षीकाम पहाण्यासारखें आहे. पुढें ६२ पायऱ्या चढून गेल्यावर एक गणपतीचें देवालय लागतें. व पुढें ६१ पायऱ्या चढून गेल्यावर भूतकेश्वराचें महाद्वार लागतें. याचे आंत दोन कोरींव मंडप लागतात. ते दोन मजली आहेत. भूतकेश्वराचें देऊळ दुसरे मजल्यावर आहे. त्याचे लिंगाची उंची पांच फूट आहे व त्याचे मंदिराचें शिखर सोन्याचें आहे. त्या देवांचें उत्पन्न २० हजार आहे.

खालचे मजल्यावर पार्वतीचें देऊळ आहे. तें पाहून पूर्व दरवाजानें बाहेर पडलें म्हणजे वर जाण्याला वाट आहे. त्या वाटेच डावे अंगास दरवाजाचे तोंडाशीं डोंगर पोखरून एक लहानसें लेणें केलें आहे. त्या लेण्याचे एका भिंतीवर संस्कृतांत पुराण लिहिलेलें आहे. वर चढून गेलें म्हणजे माथ्यावर गणपतीचें देऊळ आहे व याचेंसभोंवतीं गॅलरी काढलेली आहे. तींत उभें राहून सर्व शह-

रांची शोभा पहावयास सांपडते. एके ठिकाणीं बिभीषण रामाला नेत असतां जेथें डोंगराला पाय लागले, त्या ठिकाणीं पादुका आहेत म्हणून सांगतात, पण त्या ठिकाणीं जाण्यास जी वाट आहे ती फार बिकट असल्यामुळें फारसे कोणी जात नाहीं असें कळलें, म्हणून आम्हींही जाण्याचें धाडस केलें नाहीं. मग आम्ही किला उतरून आलों. त्या किल्ल्याचे पायथ्याजवळ एक तलाव आहे. त्या तलावाचे कांठीं एक इमारत आहे. त्या इमारतींत आतां एक कॉलेज भरत असतें; पण पूर्वीं येथें लॉर्ड क्लाइव्हसाहेब रहात असत. या गांवांतही तंजावरप्रमाणें महाराष्ट्रीय ब्राह्मण पुष्कळ आहेत. व त्यांनीं महाराष्ट्र भाषोत्तेजनार्थ एक संस्था स्थापिली आहे.

तारीख ३ ला दुपारीं बारा वाजतां त्रिचनापल्लीहून आम्ही निघालों तों संध्याकाळीं येरोड स्टेशनवर आलों. येथून कोइमतूरवरून उटकमंडला जावें असा विचार होता; पण तेथें त्या वेळीं थंडी फार आहे असें सांगण्यांत आल्यामुळें तो बेत रहित केला व कोइमतूरकडून जालारपेटला जाणारी जी गाडी येते तींत बसून जालारपेटला येऊन उतरलों, व मग मद्रासेकडून बंगलोरला जाणाऱ्या गाडींत बसून भौरंगीपेठेला गेलों. नंतर कोलार येथील सोन्याच्या खाणीला जाणाऱ्या गाडींत बसून उरीगमला पहांटे पांच वाजतां उतरलों. म्हणजे त्रिचनापल्लीला दुपारीं १२ वाजतां जे बसलों ते दुसरे दिवशीं सकाळीं सोन्याच्या खाणीला आलों. रात्रभर जाग्रण, एक वेळ उपास व चार ठिकाणीं गाडी बदलावी लागली. त्यामुळें हा प्रवास फार त्रासदायक झाला.

कोलार.

तारीख ४ ला उजाडल्यावर खाणी पहावयास गेलों. प्रथम जेथें बीज सांठवून ठेवण्याचें काम चाललें असतें तेथें गेलों. शिवगंगा-

सागर हें एक कावेरीनदीचे कांठीं क्षेत्रस्थान आहे. तेथें मोठा धबधबा आहे. कावेरीचा हाच तो प्रसिद्ध धबधबा होय. गिरसप्पाचे खालोखाल हा धबधबा प्रसिद्धच आहे. हा धबधबा ३०० फुटांवरून खाली पडतो. त्या धबधब्याच्या साह्याने वीज उत्पन्न करून ती १०० मैलांवर कोलारास व उरीगमला आणली आहे. उरीगमला ती वीज सांठवून ठेवून, तिचें नियमन केलें आहे. व पांच ठिकाणीं सोन्याच्या खाणीचीं कामें चाललीं आहेत त्या सर्वांना वीज पुरविणें हें सर्व काम उरीगमला होतें. हें सर्व म्हैसूर-सरकाराचे ताब्यांत आहे. पण सोन्याच्या खाणी चालविण्याचें काम एका युरोपियन कंपनीचें ताब्यांत आहे. ही कंपनी वीज पुरविण्याबद्दल म्हैसूरसरकारला दरमहा १८५००० रुपये देते म्हणजे वर्षाला २२२०००० रुपये होतात. शिवाय ही कंपनी सोन्याचें जें उत्पन्न होईल त्यावर शेंकडा ५ रायल्टी देते. ही वर्षाची १५ लक्ष होते. म्हणजे म्हैसूरसरकारला त्या सोन्याच्या खाणीपासून ३७ लक्षावर उत्पन्न होतें.

येथें वीज सांठविणें वगैरे सर्व काम पाहून आम्ही सोन्याच्या खाणीचें काम पहावयास गेलों. सोन्याच्या खाणीची खोली जवळ जवळ एक मैल आहे. यांत खालीं वर येण्याला हॅड्रालिक लिफ्ट-सारखे पाळणे केलेले असतात. त्यांत बसून माणसें खालीं खाणींत कामाला जातात व काम झालें व सुटीची वेळ झाली म्हणजे वर येतात. खालीं जाण्याला तीन मिनिटें लागतात. खालीं हवेचा सारखा पुरवठा करण्याचें काम चाललें असतें. मागें एकदां अपघात झाला होता म्हणून प्रेक्षकाला कोणाला फारसें खालीं जाऊं देत नाहींत. येथून सोन्याचे फत्तर फोडून वर काढतात. व मग खडी करण्याचें यंत्र असतें त्यांत तें घालतात म्हणजे त्यांची खडी होते. मग ही खडी दुसऱ्या यंत्रांत घातली म्हणजे तिचा भुगा

होतो. मग हा भुगा, पाणी आणि पारा यांचें मिश्रण मोठमोठ्या फळ्यावरून जाऊं देतात म्हणजे पारा व सोनें यांचें मिश्रण होतें. मग वाळूपासून पाऱ्याचें मिश्रण निराळें करितात. आणि तें पाऱ्याचे मिश्रण एका वाटींत घालून तापविलें म्हणजे पारा उडून जातो व सोनें निराळें होतें. हें सर्व पाहून झाल्यावर बिऱ्हाडीं आलों व जेवण-खाण करून उरीगम येथें आगगाडी आल्यावर तींत बसलों व भौरंगी पेठेला उतरलों. तों मद्रासेकडून बंगलोरला जाण्याला गाडी आली होती तींत बसून बंगलोरास गेलों. रात्र झाल्यामुळें रामाचा फराळ करून निजलों. बंगलोरास स्टेशनावर २।४ धर्मशाळा आहेत.

बंगलोर.

ता. ५ ला बंगलोरास गेलों. तेथें **म्युझीयम** पहाण्यासारखा आहे. तो पहाण्यास आम्हीं प्रथम गेलों. म्युझीअममध्यें मासे वगैरे प्राण्यांचे हुबेहुब नमुनें ठेवलेले आहेत. येथें लढाईचीं जुन्या तऱ्हेचीं अनेक हत्यारें आहेत. कांहीं कांहीं मातीचे चित्रांचे देखावे केलेले आहेत. या म्युझीअमचे मागचे अंगास अठराकचेरी म्हणून ज्यांत सरकारी सर्व आफिसें भरतात अशी इमारत आहे. या कचेरीच्या पुढें फार मोठें मैदान आहे. हें नीट व्यवस्थित ठेवलें असल्यामुळें मोहक दिसतें. नंतर बिऱ्हाडीं परत आलों. जेवणखाण झाल्यावर ढोल्या गणपतीला गेलों. हा गणपति काळा-कुट आहे. बहुतेक गणपती तांबडे असतात. येथून जवळ **बसव**-ण्णाचें देऊळ आहे. हा **नंदीही** रामेश्वर, तंजावर येथील नंदीं-प्रमाणें मोठा आहे. येथून जवळच असलेल्या एका लहानशा टेकडीवर चढलों. हिला **बिगूल** रॉक म्हणतात. येथून गांवची शोभा अपूर्व दिसते. नंतर आम्ही बंगलोरची प्रसिद्ध लालबाग पाहाण्यास गेलों. या बागेंत बहुतेक सर्व वनस्पति आहेत,

म्हणून ही वनस्पतिशास्त्रदृष्ट्या फार महत्वाची बाग आहे. त्या बागेंत निरनिराळ्या जातींचे पक्षी व माकडेंही ठेवलेलीं आहेत.

ता. ६ रोजीं सकाळीं गांवीपूर म्हणून एक खेडें आहे. तेथें एक डोंगर पोखरून देऊळ तयार केलें आहे. म्हणजे लेणें आहे म्हणाना. त्या देवळाभोंवतीं प्रदक्षिणेची वाट पोखरून बोगद्या-प्रमाणें केलेली आहे. येथें शंकराचार्यांचा मठ म्हणून एक नवीन इमारत बांधिलेली आहे. ही बांधण्याचा उद्देश येथें संस्कृत पाठ-शाळा स्थापावयाची आहे त्याकरितां ही इमारत आहे. पण अजून हिचा अनावरणसमारंभ व्हावयाचा आहे. नंतर पेठेंत जाऊन जरूर ते जिन्नस घेतले. जेवणखाण झाल्यावर टाटारीसर्च इन्स्टिटयूट पहावयास गेलों. ही गांवापासून ५ मैलांवर आहे. येथें बरेच दक्षिणी विद्यार्थी शिकण्याला आलेले होते. येथें सेंद्रिय-रसायन, निरिंद्रियरसायन, उपयुक्तरसायन, सामान्यरसायन, अशा रसायनाच्या ४ शाखा आहेत व एक विजेची शाखा आहे. विजेच्या शाखेंत लोखंड फुटलें तर विजेच्या साहाय्यानें कसें जोडतात हा प्रयोग करून आम्हांस दाखविला. विसाडी लोक दोन तुकडयांचा एक जीव करावयाचा असला म्हणजे लोखंड लाल करून दोन्ही तुकडे एकमेकांवर ठेवून घणानें ठोकतात तेव्हा एकजीव होतो. पण समजा, एखाद्या आगबोटीला चीर पडली तर तेथें विसाडी काय करतील ? पण धनविद्युत व ऋणविद्युत यांच्या तारा दोन बाजूला आणून लावल्या म्हणजे चीर बुजून जाते. केवढा हा चमत्कार. दुसरेही विद्युतचे चमत्कार पाहिले. अशुद्ध मातीपासून कॅलशिम काढलेलें एका विद्यार्थ्यानें दाखविलें. असें अशुद्ध धातुपासून शुद्ध करून काढलेले व बाटल्यांत भरून ठेवलेले पदार्थ आम्ही पाहिले. चंदनापासून तेल काढण्याची बंगलोरास

एक गिरणी आहे ती पाहाण्यास जाणार होतों. पण वेळ झाला म्हणून बिन्हाडीं परत आलों.

श्रीरंगपट्टण.

ता. ७ रोजीं सकाळीं बंगलोराहून निघालों तों १० वाजतां श्रीरंगपट्टणास येऊन पोचलों. येथें **कावेरी** नदी आहे व तिचे तीन फाटे झाले आहेत. एक फाटा श्रीरंगपट्टणाचें उत्तरेकडून जातो व दुसरा दक्षिणेकडून जातो व तिसरा दक्षिणेकडून मग तो पश्चिमवाहिनी होतो. श्रीरंगपट्टण कावेरी नदीचें फाट्यांत सांपड-ल्यामुळें येथें नेहमीं मलेरिया असतो. त्यामुळें येथली हवा फार-दूषित झाली आहे. येथें कावेरी नदीचा एक फाटा **पश्चिमवाहिनी** असल्यामुळें तें तीर्थ झालें आहे व त्या दिवशीं एकादशी असल्या-मुळें आम्हीं आगगाडींतून उतरलों तों प्रथम कावेरी नदीवर स्नानास गेलों. कावेरी नदीचें कांठचीं तीन मुख्य क्षेत्रें मानतात. अशी कथा आहे कीं, श्रीरंग कावेरी नदीचें कांठीं आडवे निजले आहेत. त्यांचें शीर श्रीरंगपट्टणास आहे. नाभी शिवगंगा सागर येथें आहे–येथें धबधबा आहे, व त्यापासून वीज उत्पन्न करून कोलारास नेली–आहे व पाय त्रिचनापल्लीजवळ श्रीरंगास आहेत.

स्नान झाल्यावर **श्रीरंगाचें** दर्शनास गेलों, तों त्यांची पूजा-अर्चा चालली होती. पूजाअर्चा झाल्यावर येथेंही प्रसाद म्हणून शिजलेला भात, खिचडी वाटण्यांत आली व लोक आज एका-दशी होती तरी हा प्रसाद खात होते. आम्ही मात्र एकादशी असल्यामुळें भात खाल्ला नाहीं. बाजारांत जाऊन केळीं, शहाळीं आणलीं व फराळ केला. नंतर गांवचें पूर्व टोंकाला एक **मशीद** होती ती पाहण्यास गेलों. मशीदीचें मनोरे उंच आहेत. व त्यावर सोन्याचें कळस आहेत.नंतर गांवाचें तटाचे बाहेर पाव

एक मैलावर दर्यादौलत म्हणून एक इमारत आहे तिकडे गेलों. ही इमारत हैदर-टिपूच्या वेळची आहे. ती कावेरी नदीचें कांठीं आहे. इमारत फारशी मोठी नाहीं पण फार सुंदर आहे. इमारतीचे पश्चिमेकडील भिंतीवर, इंग्रजांची व टिपूची जी शेवटली लढाई झाली तिची रंगीत चित्रें काढलेलीं आहेत. पूर्वभागाच्या भिंतीवर मुसलमानी दरबारच्या देखाव्यांचीं चित्रें आहेत. इतर भिंतीवर झाडें वगैरे रंगीत काढलेलीं आहेत. इमारत लहान पण नक्षीचें काम असल्या-मुळें फार मोहक वाटते व पूर्वकालच्या वैभवाची आठवण होते. त्या इमारतीचें सभोवार बाग आहे तोही फार सुव्यवस्थित ठेव-लेला आहे. झाडांचें कातरकाम करून मोर, हत्ती, खुर्च्या वगैरे आकार दिले आहेत. कावेरी नदीचे अंगास नदीवर एक लहानसा घांट बांधिलेला आहे. दुसरे एके ठिकाणीं कावेरी नदीचे कांठावर पण झाडांच्या छायेखालीं बसण्याकरितां बाकें टाकलीं आहेत. बागेंत शिरतांना रस्त्याचे दोन्ही अंगास चिकीची झाडें लाविलीं आहेत, तीं उंचच उंच गेलीं असून तांबड्या लाल फुलांनीं भरून गेलेलीं होतीं. सर्व बाजूंनीं ही दर्यादौलत इमारत फारच रमणीय व मोहक झाली आहे. ह्या दर्यादौलतीचे पूर्वेस १।२ मैलांवर टिपू व हैदर यांचीं थडगीं आहेत. परत येत असतां स्टेशनाचे जवळच एक विटांची कमान लागली. ह्या कमानीवर जाऊन पाय हापटले म्हणजे ही कमान हालते. ही एका फ्रेंचमननें बांधली. ही पहाण्याकरितां तज्ज्ञ लोक फार येतात. श्रीरंगपट्टणाचा किल्ला—ज्या किल्यावर इंग्रजांनीं मारा करून किल्यास खिंडार पाडून किल्यांत शिरून किल्ला हस्तगत केला तें ठिकाण पहाण्याकरितां गेलों. ह्याच किल्याचे पश्चिमेस कावेरी नदीचें तीन फाटे झाले आहेत व हा किल्ला श्रीरंगपट्टणचे पश्चिमेस आहे. जेथें खिंडार पाडलें त्या बुरुजावर विजयस्तंभ उभारला आहे. व त्यावर चारही बाजूला लिहिलेलें

आहे. १७९९ एप्रील ५ तारखेपासून मे ४तारखेपर्यंत हा किल्ला लढत होता. लेफ्टनंट जनरल हॅरीस हे मुख्य सेनापती होते.

	मेले.	जखमी झाले.	पत्ता नाहीं.
इंग्रज	१९२	६५७	२५
नेटिव	१०८	३८५	९७

२४ युरोपियन ऑफिसर्स कामीं आले असें लेख आहेत.

म्हैसूर.

नंतर आम्हीं श्रीरंगपट्टण स्टेशनवर येऊन गाडींत बसून म्हैसूरास आलों तों रात्रीचें ८ वाजून गेले होते. येथें पुष्कळ धर्मशाळा आहेत. त्यांत नंदराजबहादूर यांची धर्मशाळा फार प्रचंड असून दुमजली आहे. त्या धर्मशाळेंतील सर्व खोल्या भरून गेल्या असल्यामुळें आम्हांस जागा मिळाली नाहीं म्हणून आम्हीं दुसऱ्या एका धर्मशाळेंत गेलों, व थोडासा फराळ करून निजलों.

तारीख ८ ला स्नान वगैरे करून द्वादशी होती म्हणून स्वयंपाक करून भोजन केलें. नंतर म्हैसूरमधील निरनिराळीं स्थळें बघण्यास निघालों. प्रथम प्राणिसंग्रहालयांत गेलों. हें ठिकाण म्हैसूरपासून तीन मैलांवर आहे. ह्यांत सिंह, वाघ, कोल्हे, लांडगे, निरनिराळ्या जातींचीं माकडें आहेत. त्यांत एक ओरंगओत्तांग होता. त्यांत पुष्कळ प्रकारचे राघू वगैरे पक्षी होते. हिमालयाकडील काळीभोर अस्वलें व आर्कटिक कटीबंधाकडील पांढरीं शुभ्र अस्वलें होतीं. पांढऱ्या अस्वलांची मान फार लांब असते, व त्यांचे अंगावर केस फार नसतात. येथें जिराफही आहेत. ग्यू म्हणून एक घोड्यासारखें पण शिंगें असलेलें जनावर आहे. मोर चित्रविचित्र रंगांचे आहेत. त्यांत एक निळ्या रंगाचा फारच सुंदर दिसत होता. नंतर आम्ही प्लेझर–पॅलेसमध्यें गेलों. हा राजवाडा बघ-

ण्याला बंदी आहे, तथापि बाहेरून काय दिसेल तेवढें पाहून मग महाराजसरकारांच्या पागा आहेत त्या पहाण्यास गेलों. येथें शेदीडशे घोडे आहेत. घोडे चांगलें मजबूत व मोठे आहेत. येथें महाराजांचे बसण्याचे रथही ठेविलेले आहेत. त्यावरील नक्षीकाम सुरेख आहे. नंतर बॉडीगार्ड म्हणून दुसरी एक पागा आहे तिकडें गेलों. त्या पागेंत ६० च घोडे आहेत पण ते फार मजबूत आहेत व सर्व काळ्या रंगाचे आहेत. त्या पागेला लागून एक सडक जाते. त्या सडकेच्या दोन्ही अंगांस फुलझाडें वेल वगैरे लावून एक फर्लांगाचा बगीचा केला आहे, व दुतर्फा हवा खाण्यासाठीं मधून मधून बाकें ठेविलीं आहेत. त्या बागेच्या तोंडाशीं रस्त्याच्या दोन्ही अंगाला उंच उंच खांब रोवून त्यावर एक जाळें टाकिलें आहे. तें रस्त्यावर छतासारखें झालें आहे. व त्यावर वेल सोडला आहे. हा देखावा फारच रमणीय झाला आहे.

नंतर आम्हीं राजवाडा पहाण्याकरितां निघालों. वाटेंत दोड-नयरी म्हणजे मोठा तलाव लागला. राजवाड्यांत आंत जाऊं देत नाहींत. बाहेरूनच काय पहातां येईल तें पहावें. राजवाडा पुष्कळ उंच आहे. बाहेरील नक्षीकाम बरेंच दिसतें. आंत काय इंद्रभुवन आहे कीं काय कोण जाणें ! राजवाड्याचे तोंडाशीं हनुमंताचें लहानसें देऊळ आहे. नंतर कर्झनपार्क, हार्डिंज सर्कल, व मंडई पाहून गांवापासून ३।४ मैलावर दक्षिणेस एक सरकारी चंदनी अत्तर काढण्याची गिरणी आहे ती पाहाण्यास गेलों. चंदनाचीं झाडें तोडून आणून त्याचा भुगा करितात व मग वाफेवर त्याचे अत्तर काढितात.

तारीख ९ रोजीं उठल्यावर स्नान वगैरे आटोपून म्हैसूरपासून ३ मैलांवरचा मुंडीचा डोंगर आहे. त्यावर देवीचें देऊळ आहे तें पहाण्यास गेलों. डोंगरावर चढण्याला चांगल्या पायऱ्या बांधलेल्या आहेत. दर

१०० पायऱ्या झाल्या म्हणजे १००।२०० असें आंकडे मांडलें आहेत. असें १००० पर्यंत आंकडे आहेत व पुढेंही दोनएकशे पायऱ्या आहेत पण आंकडे मांडलेले नाहींत. इतका हा डोंगर उंच आहे. ४५० पायऱ्या चढून गेल्यावर बसवण्णाचें एक देऊळ लागतें. हा नंदी आतांपर्यंत जे ४।५ नंदी पाहिले त्या सर्वांत मोठा आहे. त्या ठिकाणींच एक मोठा दगड होता त्याचा घडवून हा केलेला असला पाहिजे. हा दुसरें ठिकाणीं घडून येथें आणून ठेवणें अशक्य आहे. हा २७ फूट लांब, १८ फूट रुंद व १५ फूट उंच आहे. डोंगर चढून वर गेल्यावर देवीचें दर्शन घेतलें. येथें महाराजांनीं उन्हाळ्यांत राहण्याकरितां उंचावर बंगला बांधला आहे. हें सर्व पाहून झाल्यावर खालीं उतरलों व गोशाळा पाहिली. यांत निरनिराळ्या जातींच्या २० एक गाई आहेत. नंतर हत्तीखाना पहाण्यास गेलों. येथें १०।१२ हत्ती होते व आणखी ७।८ असतात पण ते बाहेर गांवीं गेले होते असें सांगण्यांत आलें. हें सर्व पाहून परत बिऱ्हाडीं आलों व जेवणखाण करून दुपारीं अठरा कचेऱ्या, म्हैसुरास, स्थापलेली नवी युनिव्हर्सिटी, वगैरे पहाण्यास गेलो. येथील अठरा कचेऱ्यांची जागा बंगलोरप्रमाणें रम्य नाहीं. नंतर कॉलेजांत आलों तों कॉलेजच्या मधल्या हालांत विद्यार्थी बसले होते व मिसेस सरोजिनी नायडूचे व्याख्यान चाललें होतें. या बाई मोठ्या वक्त्या आहेत. त्यांचा आवाज मधुर, भाषणशैली उत्तम व आवेशयुक्त आहे. त्यांचेबरोबर त्यांचे पति डॉक्टर नायडू व कन्या हीं होतीं. व्याख्यान झाल्यावर कॉलेजचे होस्टेल. नवीन युनिव्हर्सिटीची चाललेली इमारत पाहून बिऱ्हाडीं आलों.

हिंदुस्थानांतील बहुत राजधानींचीं शहरें पाहिलीं पण म्हैसुर-सारखें सुंदर शहर नाहीं. शहरांत दाट वसती कोठेंही नाहीं म्हटलें तरी चालेल. जिकडे तिकडे बंगलेवजा घरें; रस्ते रुंद, कोठें कोठें

यांची रुंदी १००।१०० फूट सुद्धां आहे. रस्त्यानें जिकडे तिकडे विजेचे दिवे. चामुंडीच्या १२०० पायऱ्यांवर सुद्धां विजेचे दिवे. त्यामुळें रात्रीं ही टेकडी शहरांतून मजेदार दिसते.

ता. १० ला म्हैसूरहून सकाळीं ८ वाजतां निघालों. त्या दिवशीं अर्धोदय पर्व होतें व हेतु हा कीं त्या पर्वाला तुंगभद्रेंत हरेश्वरास स्नानास जावें पण तें साधलें नाहीं. कारण गाडी अरस्केरीला संध्याकाळीं ५ वाजतां जाऊन पोहचली व तेथून हरिहराला जाण्याला रात्रींशिवाय गाडी नाहीं. म्हैसुरपासून अरस्केरीला हा आगगाडीचा फाटा म्हैसुरकरांनीं नवीनच केला आहे व हा नुकताच चालू झाला. व त्या आगगाडीचें सर्व काम एतद्देशीय एनजिनियरच्या देखरेखीखालीं झालें आहे.

म्हैसूराहून निघालों तों पहिलें स्टेशन बळगोळ लागलें. त्या स्टेशनापासून दोन मैलांवर **कनमाडी** म्हणून तलाव आहे. हा तलाव फार प्रचंड आहे. त्याचा बंधारा २॥ मैल लांबीचा आहे. जगांत त्यांचेपक्षां एकच तलाव मोठा आहे म्हणून ऐकलें. हा आगगाडींतून दिसतो. नंतर संध्याकाळीं अरस्केरीला येऊन उतरलों व रात्रीं १० वाजतां बंगलोरकडून हरिहरला जाणारी गाडी येते तींत बसून दुसरें दिवशीं सकाळीं हरिहरला गेलों.

हरिहर.

ता. १० चे आदले दिवशीं अर्धोदय असल्यामुळें हरिहरला पुष्कळ यात्रा आलेली होती. त्यामुळें धर्मशाळेंत जागा मिळण्याला पंचाईत पडली. पण त्यांतल्यात्यांत कशी तरी जागा मिळवून सामान लावून तुंगभद्रा नदीवर स्नानास गेलो. तुंगापान व गंगास्नान म्हणतात त्याप्रमाणें तुंगेचें पाणी फार गोड लागतें. स्नान करून आल्यावर मग हरिहराचें दर्शनास गेलों. हरिहर या मूर्तींत

हरि आणि हर असे दोन्ही देव आहेत. एका हातांत शंख, दुसरें हातांत चक्र, तिसरे हातांत त्रिशूळ आहे व चवथा हात रिकामा आहे. शिरावर अर्ध्या भागावर किरीट व अर्ध्या भागावर जटा आहेत. या मूर्तीला गुडघ्यापासून खालचे पाय नाहींत. ते तुंगभद्रा नदींत आहेत असें सांगतात व उन्हाळ्यांत जेव्हां नदीचें पाणी आटून जातें तेव्हां दिसतात असें म्हणतात. नंतर बिऱ्हाडीं येऊन भोजन झाल्यावर पुनः तिसरें प्रहरीं देवळांत गेलों. त्या वेळीं देवाला वस्त्रें, भूषणें घातलीं होतीं.

ता. ११ रोजीं मेलनें निघालों आणि पुण्यास आलों. इतका हा प्रवास होण्याला एक महिना लागला.

पुण्यास परत येताना खालील क्षेत्रें व स्थळें पहाण्यासारखीं आहेत. तीं पहावीं. आम्ही तीं बहुतेक सर्व पूर्वींच पाहिलीं असल्यामुळें ह्या खेपेस पाहिलीं नाहींत.

उटकमंड—ता. ३ ला आम्हीं त्रिचनापल्लीहून निघालों तो येरोडा स्टेशनवर आलों असा उल्लेख मागें आला आहे. तेथून कोईमतूरला जावें व तेथून उटकमंडला जावें. मद्रास इलाख्यांतील हवा खाण्याचें हें उत्तम ठिकाण आहे. समुद्रसपाटीपासून याची उंची ७३०० फूट आहे. म्हैसूरहूनही उटकमंडला जाणें अलिकडे सोईचें झालें आहे.

गिरसप्पा धबधबा—म्हैसूरहून हरीहरला येताना वाटेंत बिरूर स्टेशन लागतें, तेथून शिमगोवाला एक फाटा जातो. त्यानें जाऊन शिमगोवाला उतरून तेथून ६४ मैलावर **जोग** खेडें आहे. त्याला मोटारीनें जावें तेथें गिरसप्पा अगर त्याला तेथील लोक जोग धबधबा म्हणतात तो आहे. हा जगप्रसिद्ध व प्रचंड धबधबा आहे. हे ४ धबधबे आहेत. त्यांची उंची आठनऊशें फूट आहे.

हे फारच सुंदर व प्रेक्षणीय आहेत. ते पहावे व मग परत शिमगोआहून बिरूला येऊन मग हरिहर क्षेत्रास यावें व तेथून हुबळीला यावें. किंवा हुबळीहूनही शिरशीवरून मोटारीनें गिरसप्पाला जातां येतें व हेंच सोईचें आहे.

विजयानगर—हुबळीहून, गदगवरून गुंटकल लाईननें ७।८ स्टेशनें गेलें म्हणजे हंपी स्टेशन लागतें. तेथें उतरून विजयानगरला जावें. पूर्वी येथें वैभवशाली हिंदु राज्य होतें. त्याची साक्ष म्हणून तेथील पूर्वीच्या इमारतींचे अवशेष राहिले आहेत. ते जरी आतां अवशेष आहेत तरी फारच प्रेक्षणीय आहेत. ते जरूर जाऊन पहावे म्हणजे तेथील पूर्वीच्या इमारतींची थोडीशी कल्पना येईल.

बदामी—परत गदगला येऊन गदग—सोलापूर लाइननें बदामी स्टेशनवर उतरून बदामीची **लेणी** पहाण्यासारखीं आहेत तीं पहावीं.

विजापूर—पुढें विजापूर स्टेशनवर उतरून स्टेशनाजवळ असलेली **गोलघुमट** ही भव्य इमारत व गांवांतील मुसलमानी अमदानींतील इतर इमारती पहाव्या.

गोकाकचा धबधबा—विजापूराहून मोटरनें शेडबाळ स्टेशनला येऊन तेथून ४।५ स्टेशन मार्गे जाऊन गोकाकचें स्टेशन आहे. तेथून जवळच धबधबा आहे. तोही पहाण्यासारखा आहे. हा दोन अडीचशें फूट उंच आहे.

नरसोबाची वाडी—नंतर आगगाडीनें मिरज येथें येऊन मग मिरज ते कोल्हापूर लाईननें नरसिंगपूर स्टेशनावर उतरून तेथून ८।१० मैलावर असलेलें नरसोबाची वाडी येथील **दत्तात्रयाचें** प्रसिद्धच स्थान पहावें.

कोल्हापूर–परत स्टेशनावर येऊन कोल्हापूरास जाऊन तेथील **महालक्ष्मीचें** दर्शन घ्यावें व तेथील इतर इमारती पाहून परत मिरजेस येऊन पुण्याकडे जाणाऱ्या आगगाडींत बसून भिलवडी स्टेशनावर उतरून येथून ४ मैलावर औदुंबर खेडे आहे.

औदुंबर–येथें **दत्ताचें** प्रसिद्ध स्थान आहे. त्याचें दर्शन घ्यावें.

सातारा–कोरेगांव स्टेशनवर उतरून मोटारनें साताऱ्यास यावें व तेथील **अजिंमतारा** किल्ला, **यौतेश्वर**, **जरंडा**, राजवाडा वगैरे स्थळें पहावीं. तेथून ७ मैलावर असलेल्या परळी येथील **रामदास स्वामीच्या** पादुकांचें दर्शन घ्यावें.

जेजुरी–परत स्टेशनावर येऊन वाटेंत जेजुरी स्टेशनावर उतरून जेजुरीच्या **खंडोबाचें** दर्शन घ्यावें व मग परत पुण्यास यावें.

प्रथम आम्ही जे निघालों ते रेनिगुंठा स्टेशनाला आलों पण त्या वाटेंतही कांहीं क्षेत्रें व प्रेक्षणीय स्थळें आहेत. तीं बहुतेक सर्व पूर्वी आम्हीं पाहिलीं असल्यामुळें या खेपेस आम्ही तीं पहाण्याकरितां उतरलों नाहीं.

पंढरपूर–पुण्याहून निघालें म्हणजे कुर्डुवाडी (बार्सी रोड स्टेशन) स्टेशनावर उतरून बार्सी पंढरपूर रेल्वेनें पंढरपूरला जावें व तेथें चंद्रभागा नदींत स्नान करून विठोबाचें दर्शन घेऊन मोटारनें अगर परत आगगाडीनें सोलापूरास जावें.

तुळजापूर–सोलापूराहून ३२ मैलावर आहे. तेथें मोटारनें तुळजापूराला जाऊन भवानीचें दर्शन घेऊन परत सोलापूरास यावें.

गाणगापूर–गाणगापूर स्टेशनावर उतरून तेथून ७ मैलावर गाणगापूर येथील दत्तांचें प्रसिद्ध स्थान आहे त्याचें दर्शन घ्यावें. अशी हीं तीन दत्ताचीं प्रसिद्ध स्थानें आहेत.

एक नरसोबाचे वाडीस, २ रें औदुंबर येथें आणि ३ रें गाणगापूरास.

हैद्राबाद–परत स्टेशनावर येऊन आगगाडीनें वाडी जंक्शनवर यावें व तेथून एका आगगाडीच्या फाट्यानें हैदराबादेस जावें. हिंदुस्थानांत हें सर्वांत मोठें संस्थान आहे. तेथील इमारती, बागा वगैरे पाहून परत वाडी जंक्शनवर येऊन गुंटकल स्टेशनला यावें.

मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग–येथें जावयाचें असेल तर गुंटकल स्टेशनावर उतरून दुसऱ्या एका रेल्वे फाट्यानें जावें लागतें. नसेल तर तसेंच पुढें जाऊन रेनिगुंठा स्टेशनावर उतरावें. पुढील रामेश्वरयात्रेचें वर्णन ह्या पुस्तकाचें आरंभापासून दिलें आहे.

मल्लिकार्जुन हें ज्योतिर्लिंग श्रीशैल पर्वतावर आहे. आगगाडींतून उतरल्यावर बरेच पायीं जावें लागतें. हा रस्ता धोक्याचा आहे. म्हणून यात्रेकरी एरवीं फारसे जात नाहींत. पण येथें शिवरात्रीला मोठी जत्रा भरते तेव्हां ते जातात व ह्या ज्योतिर्लिंगाचें दर्शन घेतात. मद्रास इलाख्यांत दुसरें ज्योतिर्लिंग रामेश्वर येथें आहे. त्याचें वर्णन मागें आलें आहे.

सर्व हिंदुस्थानांत अशीं प्रख्यांत १२ ज्योतिर्लिंगें आहेत. त्यांचीं नावें व महात्म खालील श्लोकांत दिलीं आहेत.

सौराष्ट्रे सोमनाथंच । श्रीशैले मल्लिकार्जुनम् ॥
उज्जयिन्यां महाकालम् । ओंकार ममलेश्वरम् ॥
परल्यां वैजनाथंच । डाकिन्यां भीमशंकरम् ॥
सेतुबंधे तु रामेशं । नागेशं दारुकावने ॥
वाराण्यस्यां तु विश्वेशं । त्र्यबंक गौतमीतटे ॥
हिमालये तु केदारम् । घुसृणेशं शिवालये ॥
एतानि ज्योतिर्लिंगानि । सायंप्रांतः पठेन्नरः ।
सप्तजन्म कृतं पापम् । स्मरणेन विनश्यति ॥

